ब
१०२
अ/3/१२६
५२७
Marathi

साग्र संगीत

सुंदरी अथवा अनीतीचें जग

कर्ता,

पुनशी अर्जुन शहा

किंमत ८ आणे.

स्वीकारलें ता. १८ जानेवारी १९११
रजिष्टरनं. ३६ अंक

१४२ ८२८
४४०७
१२०२६
अं/३ १९४६

साग्र संगीत

सुंदरी अथवा अनीतीचें जग.

अंक १ ते ३.

कर्ता.

पुनसी अर्जुन शहा.

सन १९१०.

किंमत ८ आणे.

हें पुस्तक सन १८२५ च्या आक्टाप्रमाणें नोंदून कर्त्यानें सर्व हक आपले स्वाधीन ठेविले आहेत,

धुळें येथें खानदेश वैभव छा. छा.

DECCAN VERNACULAR TRANSLATION SOCIETY POONA 1894

प्रस्तावना.

हल्ली दिवसें दिवस शिक्षणाची वाढ होत आहे. अशावेळीं निदान आपल्या समाजांतील अनिष्ट चाली नाहींशा करण्याचा प्रयत्न करणें हें प्रत्येक सुशिक्षित गृहस्थाचें कर्तव्य आहे. सुदैवानें बालविवाहाचे चालींत हळूहळू सुधारणा होत आहे ही आनंदाची गोष्ट आहे; परंतु त्याबरोबरच 'वृद्ध-तरुणी विवाह' ही चालही नाहींशी करण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. जोंपर्यंत पुर्नविवाहाची चाल सार्वत्रिक सुरु होत नाही तोंपर्यंत "वृद्ध-तरुणी विवाह" आजिबात बंद होणें इष्ट आहे. आधींच प्लेग व दुष्काळ वगैरे दैविक संकटामुळें हजारों तरुणी विधवा होऊन दुःखसागरांत निमग्न झाल्या आहेत. त्यांत पुनः जरठ-तरुणी विवाहानें भर टाकणें ह्मणजे अनाथ बालिकांस जाणून बुजून वैधव्यदीक्षा देणें होय. वृद्धतरुणी विवाहाची चाल बऱ्याच समाजांत आहे. ती कमी करण्याचा स्तुत्य प्रयत्न व्याख्यान रूपानें व नाटक रूपानें कांहीं मंडळींनी केला परंतु त्या प्रयत्नांस यावें तसें यश अद्याप आलें नाहीं ही खेदाची गोष्ट आहे. केवळ पैशाचे लोभामुळें मुली १७।१८ वर्षांच्या वयस्कर करून वयाचे मानानें त्यांचे हुंडणावळीचे प्रमाण वाढवून निर्दयपणें मुलींचा क्रयविक्रय करणारे बरेच नराधम अद्यापिही आपले समाजांत दृष्टीस पडतात.

ही अनिष्ट चाल कशी बंद करितां येईल व ही इष्ट सुधारणा आपले समाजांत कशी घडवून आणितां येईल हा विचार आमचे मनात फार दिवसा पासून घोळत

 अ/३/१९४६

आहे. तसेंच आपले हातून आपले समाजाची कांहीं तरी अल्पसेवा घडावी अशीही उत्कृष्ट इच्छा मनांत घोळत होती. यामुळें हल्लीच्या नाटकरूपाने ह्या दुष्ट चालीचे अनिष्ट परिणाम बहुजन समाजावर बिंबविण्याचा मी अल्प प्रयत्न केला आहे. तो कित्पत् साध्य झाला आहे ह्याचा निर्णय करण्याचें काम मी देशबांधवांवर सोंपवितों. ह्या चालीमुळें तरुण अनाथ मुली वैधव्य दुःखसागरांत बुडतात इतकेंच नव्हे परंतु केवळ तारुण्याच्या अविचारामुळें ह्यांची नीतिमत्ताही बिघडल्याचीं प्रत्यक्ष उदाहरणें दृष्टीस पडतात. स्त्रीवर्ग जर सुशिक्षित असतां तर ही चाल आपोआपच बंद झाली असती; परंतु जोंपर्यंत स्त्रीवर्ग सुशिक्षित होऊन स्वतःच्या सुधारणा घडवून आणण्याची पात्रता त्यांचे अंगीं नाहीं तोंपर्यंत त्यांचे कल्याणाचा प्रयत्न पुरुष वर्गानेंच केला पाहिजे. अलिकडे बहुजनसमाजास संगीत नाटकाची गोडी लागली आहे. अशा वेळीं ह्या चालीचे अनिष्ट परिणाम संगीत नाटकरूपानें लोकांपुढें मांडल्यास त्याचा थोडाफार तरी उपयोग होईल ह्या उद्देशानें मुद्दाम हें नाटक संगीत रचिलें आहे. हें नाटक लवकरच रंगभूमीवर येऊन व तें लोकादरास पात्र होऊन समाजांतील ही अनिष्ट चाल समूळ नाहींशी झाल्यास माझ्या अल्प कृतीची सार्थकता झाली असें होऊन व माझे हातून एक उत्तम समाजसुधारणेचें देशकार्य झालें असें समजून मला धन्यता वाटेल. परमेश्वर करो आणि माझ्या ह्या अल्प प्रयत्नास यश येवो.

धुळें, तारीख १५ डिसेंबर सन १९१०.

ग्रंथकर्ता.

नाटकांत येणारीं पात्रें,

पुरुष.

सदाशिवराव पुण्यांतील धनाढ्य सावकार, सुंदरीचा नवरा.

शंकरशास्त्री–सुंदरीचा बाप.

विष्णू–मुलगी मिळवून देणारा दलाल

केशव–एक गरीब गृहस्थ.

रंगराव फांकडे–एक चैनी गृहस्थ.

सुंदरदास, **वामनराव** } व्यापारी.

कृष्णराव, **यशवंतराव**, **गोविंदराव**, **विनायकराव**, **नारायणराव** } सभेंत बोलणारे वक्ते.

या शिवाय तारवाला, राम्या, प्रमुख.

स्त्री.

सुंदरी–सदाशिवरावाची स्त्री, शंकरशास्त्र्यांची मुलगी.

चंद्रिका, **यमुना** } सुंदरीच्या मैत्रिणी,

रेवती–एक मध्यस्थ स्त्री, कुंटीण.

श्रीपरमात्मने नमः

साद्यसंगीत

सुंदरी अथवा अनीतीचें जग.

तीन अंकी नाटक.

ईशस्तुति.

(चालः—हे प्रभो विभो अगाध०)

हं स्मरा स्मरा स्मरण करा या समयीं।
देई शांति चित्तीं नित्य हृदयीं ॥ हं० ॥
बहुविध दुःख हें, हरुनिही सत्वर, देईल सुख
तो ह्या जगतीं।
नित्य स्मरा, करुनि त्वरा, दुःख हरा ॥ हं
स्मरा ॥ १ ॥
कैकही तरुनिही, भवसागर तरी, सुख भोगाया
स्वर्गीते।
श्री शांति, टाळी भ्रांति, शुद्ध कांति ॥
हं स्मरा ॥ २ ॥

अंक १ ला.

प्रवेश १ ला.

(स्थळः–पुणें शहरांत एका लक्षाधीश सावकाराचें घर.)

पात्रें:–सदाशिवराव व विष्णु दलाल.

सदाशिवरावः-हरहर गेली!!! देवा, संततीकरितां पांच पांच बायका केल्या, परंतु कांहींच नाहीं; हें अखूट धन माझ्या काय उपयोगाचें आहे! मला हीच चिंता कीं, ह्या संपत्तीचें काय होईल? माझ्यामागें कोण खाईल? आतां गांवांतील लोक व परगांवचे गृहस्थ येऊन ह्मणतील शास्त्रीबुवा, दुष्काळ फंडांत कांहीं रक्कम द्या. गरीबां करितां व उतारू लाकांच्या सोईकरितां धर्मशाळा बांधावयाची आहे, त्यांत तुह्मांस योग्य वाटेल ती रक्कम तुमच्या नांवास शोभेलशी द्या. तुमच्या सारखे देणार नाहीं तर कोण देईल? परंतु ते मूर्ख समजत नाहींत कीं, पैसा उत्पन्न कसा होतो व रुपयासारखी चमकती चीज एकदम कशी दिली जाईल! कारण एक पैशा-साठीं सारा दिवसभर किती कष्ट सोसावे लागतात. जन्मभर किती कष्ट सोसून कवडी कवडी मिळविली तेव्हां कोठें लक्षाधीश झालों! जोंपर्यंत जवळ पैसा आहे, तोंपर्यंतच सर्व विचारतात; नाहीं तर कोणी ढुंकून सुद्धां पहात नाहीं! जगांत द्रव्याशिवाय कोणतीही गोष्ट प्रिय नाहीं. तर द्रव्यास संभाळा कारण—

पद

दामाजीची दुनिया तमाम माना मुर्खहो ध्या
दामाची सांभाळ ॥ दाम नसे ते नर ह्या खर
सम जाण माना मुर्खहो ध्या दामाची सांभाळ ॥

अंतराः—

दाम मिळे मावापाचि वदती कुळ-दीपक तन
माझा ॥ दाम नसे तेव्हांचि वदति, काळतोंड्या
तूं जा जा ॥ मूर्खहो, ॥ दाम असे जयाच्या
जवळी, पुत्र खूप सेवा करिती ॥ नाहीं तर वदती
तन तूझें वृद्धपणीं नच मरती ॥ मूर्खहो ॥ तात,
मात, तन, भगिनी भार्या कोणी नसे हो वाली ॥
स्नेह सग-पण वाटे सर्वा नच पैशासम वाली ॥
मूर्खहो ॥ १ ॥

बरें, तें तर असो. परंतु मला असें वाटतें कीं, संततीचे प्राप्तीकरितां आणखी एखादी कुलवधु पाहून नशिबाची परीक्षा पहावी. परमेश्वराच्या मनांत देण्याचें असेल, तर एखादा पुत्र देईलच देईल. उद्योगानें नशीब फळ देईल असें माझें मन मला सांगत आहे. म्हणून कालच त्या विष्णु दलालाला बोलाविलें होतें त्यानें आज येण्याचें कबूल केलें आहे. परंतु अजून कां आला नाहीं; (विष्णू येतो) आलाच वाटतें. बेट्याचें आयुष्य फारच मोठें कीं नांवाचीं अक्षरें तोंडांतून निघण्याचा अवकाश कीं उभा राहिलाच.

विष्णू:—नमस्कार शेटजी.

सदाशिवराव: – नमस्कार भटजी. या बस, असे जवळ येऊन.

विष्णू:— नको, आम्हां गरीबांना येथेंच बरें. आपल्या समोरच आहे ना ?

सदाशिवराव:— कां भटजी, प्रकृति बरी आहे ना ?

विष्णु:— आपल्या कृपेनें सर्वच कांहीं चांगलें आहे व आनंदीआनंदच आहे. परंतु मला पाचारण कां केलें ? सेवकासारखें काम असेल तर सांगणें. एका पायावर करण्यास तयार आहे.

सदाशिवराव:–पहा भटजी, तुम्हाला कळलेंच असेल कीं आमचें पांचवें कुटुंब परवांच वारलें. त्यामुळें मनाला स्वस्थपणा नाहीं. करितां मनाला वाटतें त्या ठिकाणीं एखाद्या नवीन कुटुंबाची योजना करावी आणि एवढ्याचकरितां काल राम्याला सांगितलें कीं, विष्णू भटजीला बोलावून आण.

विष्णू:—बरोबर आहे. कुटुंबाशिवाय घराची शोभा नाहीं. हल्लीं तुह्मांस हें घर कसें शून्यवत दिसत आहे ? पण खरोखर सांगतों कीं, मी जरी अत्यावस्थ स्थितींत असलों, परंतु वधु मिळण्यासारखी असली, तर पहिला हाच विचार कीं, लागलीच लग्न करणें; नाहींपेक्षां प्राण दिलेला बरा. तुमच्याही मनांत बहुधां असेंच आलें असेल. नाहीं बरें ?

सदाशिवराव: - हाच विचार. परंतु सध्यां इकडील सुधारकांनीं ह्या विषयावर मासिक पुस्तकें, सभा भरवून व्याख्यान देणें, वर्तमानपत्रांत्त पांढऱ्यावर काळें करणें, वगैरे पुष्कळ यत्न चालविले आहेत. त्यांच्या मतानें जर लोक वागूं लागले, तर कसें होईल, हे विचार मनांत येतात.

विष्णू:—असे कित्येक डोकें फोडणारे भेटतात त्यांचें ऐकतो कोण? जवळ पैसा असला कीं झालें काम. सांगितलें आहे ना ' दाम करी काम बिबी करी सलाम ' आपल्या जवळ ईश्वरी सत्तेनें कांहीं कमी आहे असें थोडेंच आहे ! तर कोणाची पर्वा कशाला पाहिजे?

सदाशिवराव:—बरें असो. बसो ते माथें फोडणार. आपल्याला काय जरूर? सोड त्या फाजील गोष्टी. आतां पहा कमर बांध व माझ्याकरितां चार आठ दिवस खर्च करून सर्व ठिकाणीं फिरून एखादी सुस्वरूप व सुशिक्षित कन्या शोधून काढ.

विष्णू:—शेटजी, आमचा धंदाच हा. त्यांत तुमच्या सारख्या श्रीमंतांचें काम ह्मणजे आमचें स्वतःचेंच आह्मी समजतों. आपल्या करितां पंधरा पंधरा दिवस उपास पडल्यास बेहेत्तर, पण आपल्या मनासारखी कन्या शोधून काढतों. मग तर झालेंना?

सदाशिवराव:—परंतु देण्याघेण्यासंबंधानें काटकसर कर बरें.

विष्णु:—तें सांगणें नको. (स्वगत) दहा तेथें पंधरा. माझें काय जाणार! (उघड) माझ्यानें होईल तितकी खटपट करण्यांत मी मागें पुढें पहाणार नाहीं. परंतु माझ्याकडे नजर असूं द्या. नाहींतर गरजेपुरतें. की झालें काम मग विसरा. जसें गरज सरो नि वैद्य मरो, असें कराल !

सदाशिवराव:—छे छे. तुला कधीं विसरेन ? तूं मला उपयोगीं पडणार व मी तुला विसरेन असें कधीं होणार नाहीं. समजलास कां ?

विष्णू:—तर जें कांहीं द्यावयाचें असेल तें पूर्वीं स्पष्ट झालें ह्मणजे मागून भानगड नको. सांगावें कीं एवढें देईन. जशी साखर घालाल तसें गोड होईल.

सदाशिवराव:—तर तें तूंच बोल. कारण मेहेनत तुझी आहे, तर कांहीं नांव ठेव.

विष्णू:—पहा, ईश्वरानें आपणास पुष्कळ संपत्ति दिली आहे. मला गरीब लोक सुद्धां दोन चारशें रुपये देतात. परवां त्या महादेव खोडकरांचें सर्व कांहीं लग्नाचें नक्की ठरवून दिलें. त्यानें पांचशें रुपये रोख, आंगठी, डोक्याची पगडी, रेशीमकांठी उपरणें व हें पायातलें सुद्धां दिलें. तर तुमच्यासारख्या श्रीमंतांकडून तर ज्यास्त मिळण्याची आशा असणारच !

सदाशिवराव:—बरें सर्व कांहीं मिळेल. जितकें खोडकराजवळून मिळालें तितकें तरी देईन. काळजी करूं नको. काम किती त्वरेनें करतोस तें पहातों.

विष्णूः—तें मुळीच सांगावयास नको. पण खर्चा-करितां कांहीं मिळालें कीं, लागतो उद्योगाला.

सदाशिवरावः—घे हे खर्चाकरितां. (पन्नास रुपयांची नोट देतो.)

विष्णूः-बरें तर, येतों शेटजी नमस्कार.

सदाशिवरावः-नमस्कार. काम फत्ते झालें पाहिजे. (जातो.)

विष्णूः—पाहिलेंतका कां कशी चैन आहे ह्या धंद्यांत ! फक्त दोन शब्दानेंच इतकें मिळालें किती सुरेख धंदा!! धंदा पण धंदा !!! नाहीं तर पुष्कळसे भीक मागत फिरतात.

पद.

चाल—फटक्याची.

धंदा असे हा किती अमोलिक, ह्यासम उत्तम नच दुसरा । भिक्षा मागुनि फिरतों परीनच मिळे न मज एक पैसा खरा । कैक शिकुनी बि ए. एल्. एल्. बी. बनतील बॅरिष्टर भारी ॥ कैक बनुनि डाक्टर बसती दुकान मांडुनी सारी । ज्यांना न मिळे पैसा त्यांनी घ्यावा माझा हाच कित्ता । धंदा करावा दलालीचा मग मिळेल त्यांना मालमत्ता ।

(गात गात जातो)

प्रवेश दुसरा.

स्थळ:-पुणें शहर, शंकरशास्त्री चिपळूणकरांचें घर.

पात्रें:—शंकरशास्त्री व विष्णू दलाल.

पद. (चाल–पडतांच छाया षड्रिपुंची)

शंकरशास्त्री: —

मुलगी असे ही ठेव धनाची, वाटे आनंदाची फार ॥ ममता करूनी वाढविली ही, सोसूनी दुःख अपार ॥ सोळाही वर्षें झालीं हिजला लग्ना होत तयार ॥ घेईन रुपये रोख हिचे मी सोळा, वीस हजार ॥ ईशा, कृपा करी दे मला तू मुलगी वारंवार ॥ हृदयांत मानीन कीं तुझा मी पूर्ण खरा उपकार ॥

परमेश्वरा, काय तुझी देणगी आहे! पण खरें पहाल तर मुलगी कच्या सोन्यासारखी आहे. कदाचित् मुंबई-चे लोनचे भाव घटतील, करन्सी नोटा बुडतील, देवाचे देवांत रण घटेल. पण सुखी राखो परमेश्वर ह्या आमच्या श्रीमंत लोकांना कीं मुलीसारख्या कच्या सोन्याचे रुपये तेव्हांच पटतील, ईश्वराजवळ कोणी पैसे मागतील, कोणी मुलगा मागेल, पण तुझा हा सच्चा भक्त चारच मुली मागतो. ज्यास्ती दिल्यास तर उपकारच होतील. पण निदान चार तरी पाहिजेतच. ह्मणजे कन्यांचें दान देऊन खिसा गरम होईल आणि दारिद्य सुटेल. जसें 'एक पंथ दो काज' माझी मुलगी सुंदरी

ही खऱ्या नांवाप्रमाणें सुंदर आहे कीं ज्यावळ देवांच्या देवांगना सुद्धां लाजतील. शिकवून हुषार केलीच आहे. गुणानें पण तशीच आहे कीं, कोणीही डोळे झांकून सोळा हजार देईलच देईल. कारण गरज असली कीं सर्वच देतात कारण गांवांत मोठ्या मुली सांपडणें कठिण. परमेश्वराच्या इच्छेनें आपल्या मर्जीप्रमाणें होईल. पण तें समोरून कोण येत आहे ? (विष्णू प्रवेश करितो)

विष्णू:— नमस्कार शास्त्रीबोवा नमस्कार.

शंकरशास्त्री: — नमस्कार, विष्णु भटजी. या बसा. आज आमच्या घरीं येणें केलें. वराचा रस्ता तर नाहीं ना चुकला ?

विष्णू:—नाहीं हो मुद्दाम कांहीं महत्वाच्या कामाकरितां आलों आहे.

शंकर: — मुद्दाम ? तर असें कोणतें जरूरीचें काम आहे, कीं मज गरीबावर कृपा केली ! माझ्यानें होण्यासारखें असल्यास मी तें मोठ्या आनंदानें करण्यास तयार आहे.

विष्णू: — दुसरें कांहीं नाहीं, तुमची मुलगी आहे ना मोठी झाली, सोळावें वर्ष लागलें तरी सुद्धां स्थळ पाहिलें नाहीं. पण आज माझ्या हातांत मोठें कूळ आलें आहे. तर आपली काय इच्छा आहे ? तें कळवतां कां ?

शंकर:- इच्छा काय ती तर तुमचीच आहे, असें समजा व तुह्मीं माझें थोडेंच नुकसान करणार, मला जेथें ज्यास्त हुंडा मिळेल तेथें मी देणार. निदान वीस हजारांपेक्षां कमी घेण्याची इच्छा नाहीं.

विष्णू:—वीस हजार! अबब!!! भलतेंच कांहीं; कांहींतरी रीतीनें व शोभेल असेंच बोला.

शंकरशास्त्री:-मी तरी काय बोलूं? मुलगी अगोदर पहा तर खरी. पंचवीस हजार जरी बोललों असतों तरी शोभण्यासारखें आहे. पण उगीच तुमच्या सारख्यांचा मान ठेवावा लागतो.

विष्णू:–मुलगी पाहिलीच आहे ह्मणूनच तुमच्याकडे आलों. पण आमच्या कुळाच्या मनांत रुपये बारा हजार देण्याचे आहेत. असेल तर सांगा.

शंकरशास्त्री:—बारा तर नाहीं पण नक्की सांगूं कां, सोळा हजार घेईन. असेल तर करा कबूल.

विष्णू: – बरें देऊं पण –

शंकरशास्त्री:—-पण काय?

विष्णू: — नवरा ह्मातारा आहे.

शंकरशास्त्री: — नवऱ्याशीं काय जरूर? म्हातारा असो वा तरुण असो, आम्हांस थोडेंच पोरीचें नशीब विकावयाचें आहे?

विष्णू:—बरें तर ऐका, तुमच्याच जातींतील श्रीमंत शेट सदाशिवराव तुम्हांस माहितच आहेत व

त्यांचें कुटुंब नुकतें परवांच वारलें असून त्यांच्या इच्छे-वरून मी आपणाकडे आलों आहें.

शंकरशास्त्रीः—कबूल हो. पण सोळा हजार नक्की झाले कां ? नक्की असेल तर देऊं उद्यांच ठोकून ! पण तुह्मांस माहित आहेच कीं मला घरदार वगैरे सर्व कांहीं आहे, पण [illegible]दी नाहीं. याचा विचार करा.

विष्णूः —(बाजूस) माहीत आहे तर तुमच्या-सारखे लोभिष्ट लोक असले ह्मणजे आमच्या सारख्याचें चांगलेंच फावतें.नाहीं तर आह्मास कोणीही विचारणार नाहीं व आमचा धंदाही मुळींच चालणार नाहीं. (उघड) कांहीं हरकत नाहीं. संभाळून घेऊं; पण पहा, माझ्याकडे लक्ष ठेवा. कारण मला एक पैची देखील अजून प्राप्ति नाहीं. मी ईश्वराच्या बापाची शपथ वाहून सांगेन कीं, तुम्ही जें कांहीं द्याल तेंच पूज्य आहे. कारण आह्मांस तुमच्याजवळन जन्म चें लग्नाचें, मरणाचें मिळतेंच आहे, तुम्ही मराल तेव्हां आमचेंच आहे, खरें कीं नाहीं ?

शंकरशास्त्रीः—तें सर्व बाजूला ठेवा. पण झालें कां नक्की ? मुहुर्त केव्हांचे काढता ?

विष्णूः–हो, हो नक्की नाहीं तर शंकाच आहे वाटतें. (टिपण काढून) पहा शास्त्री येत्या शुद्ध त्रयोदशीच्या दिवशीं गुरुवारीं राहूच्या घरीं मंगळ अहे. तर त्या मंगळ नक्षत्रीं मंगळ काम करण्याची आज्ञा आहे त्या दिवशीं करा तयारी.

शंकरशास्त्री:-पण मला पहिल्यानें रुपये मिळाले पाहिजेत

विष्णू:—चला आत्तांच देववितों.

शंकरशास्त्री:-बरें तर बसा.मी आत्तां येतों.(जातो)

विष्णू:— कां कसा धंदा! डबल कमाई कशी पण बिनचूक मिळते. कोणत्या बेट्यास टिपण व पंचांग पहातां येतें? इकडचें तिकडे व तिकडचें इकडे करून लाकडाशीं माकड बांधण्याचें काम. वर मरो कीं कन्या मरो, आम्हीं कां सुतक पाळावें? तुमतें वर कन्या सावधान केलें कीं झालें काम व उरकलें लग्न.

पद.

चाल—मारा तनमा मनमा.

हा हा धंदा किती गोड वाटे मनाला, पर्वा न करी मी कोणाची। वर मरो वा कन्या मरो काय चिंता करावी न त्यांची। स्वतंत्रतेनें रहावें निशिदिनी, मिळवावें फारच धन॥ स्वार्था परिनच मार्गच दुसरा, धंदा करावा दलाली॥१॥
(शंकरशास्त्री येतो व दोघेही जातात.)

प्रवेश ३ रा.

स्थळ—रस्ता.

पात्रें: — विनायकराव व कृष्णराव.

विनायकराव: - अहो, कसें काय कृष्णराव? इतक्या गडबडीनें चाललांत कोठें?

कृष्णराव:— काय सांगू मित्रा, आजकाल ह्या देशांत पैसे घेऊन मुली विकण्याची निंद्य चाल पुष्कळ दिवसांपासून चालत आली आहे. ती नष्ट करून त्या अनाथ मुलींचे बचावाकरितां आज पृथ्वीवर पुष्कळसे लोक यत्न करितात. तरी सुद्धां ही चाल बंद होत नाहीं. परंतु आज लष्करांत त्या अग्यारीजवळ " कन्यानिषेधक सभे " तर्फे जाहीर व्याख्यान होणार आहे. तेथें जाण्याचा इरादा आहे. ही पाहिलीस कां आमंत्रण-पत्रिका ?

विनायकराव:—मित्रा, खरोखर ही चाल सुरू झाल्यापासून आपला देश कोणत्या स्थितींत आला आहे, अशी कोणत्याही मनुष्याच्या हृदयांत कल्पनाच नाहीं. धिःकार असो या श्रीमंत लोकांना. कीं मुलगी देण्याला पंधरा वीस हजार रुपये पडले तरी हरकत नाहीं. खुशाल थैल्या सोडून मोजून देतील व लग्न करतील. परंतु जर कदाचित् तुमच्यासारखा कोणी एखादा धर्माप्रीत्यर्थ कांहीं मागण्यास गेला तर त्यास शिपायाचे धक्के ! आजकाल पाहूं गेल्यास असे कन्या विकणारे लोक फारच आढळतील. ते तोडून टाकण्यास पुष्कळजण प्रयत्न करितात, वर्तमानपत्रांत लिहितात, मासिक पुस्तकें काढितात आणि आजच्या सारख्या सभा भरवून व्याख्यानें देतात. तरी त्यांचे कोठें डोळे उघडतात ! इतके प्रयत्न चालू असून कांहींच नाहीं. त्याचा उलट परिणाम चालूच आहे. जसें ' पालथ्या घागरीवर पाणी ' परंतु मला वाटतें कोणत्या नरकच्या

च्या मनांत कीव आली, किंवा असा कोणता पुढारी असेल कीं, आज ही सभा दृष्टीस पडत आहे. माझ्या-सुद्धां मनांत पुष्कळ दिवसांपासून तसें होतें. तर मित्रा चल आपण बरोबरच जाऊं. चल तर–

कृष्णरावः—पावणेनऊचा सुमार आहे. तेव्हां बहुतेक सभासद आलेच असतील व हे पहा किती जात आहेत. तर लवकर चल.

विनायकः—चला.

साकी.

द्रव्यलोभास्तव जन विकिती स्वतनया वृद्धाला।
लघुवया वैधव्य येऊनि सोडी त्या नीतीला ॥
दुष्ट असे जगतीं । रिवाज कसे असती ॥ १ ॥

(जातात.)

प्रवेश ४ था.

स्थळ-सभामंडप

(सभेचे लोक येऊन योग्यतेप्रमाणें बसतात.)

एक सभासदः-मी अशी सूचना करितों कीं, आजच्या सभेचें अध्यक्षस्थान मेहेरबान शेट साहेब रामचंद्रपंत स्वीकारतील.

दुसराः — त्यास माझें अनुमोदन आहे.

रामचंद्रपंतः—(टाळ्यांच्या गजरांत प्रमुखस्थानीं विराजमान होतात.) सद्गृस्थहो, ह्या ठिकाणीं माझ्यापेक्षां ज्यास्त असे मान देण्यालायक पुष्कळ गृहस्थ आहेत. तरी पण तुह्मीं मला जो हा बहुमान दिला त्याचा मी सप्रेम स्वीकार करितों (टाळ्या) आज ही सभा आपल्या शहारांत भरण्याचें कारण एवढेंच आहे कीं, आपल्या देशांत बलावत चाललेल्या कन्याविक्रयाचे चालीस पुढाऱ्यांनीं आळा घालून ह्या घातुक चालीस प्रतिबंध व्हावा. तरी ह्या विषयावर कोणाचें काय मत आहे तें त्यानें प्रतिपादन करावें व सर्वांनीं तें एकाग्रचित्तानें ऐकावें, अशी विनंती आहे.

कृष्णरावः — अध्यक्ष महाराज व सभ्यगृहस्थहो, आपल्या देशांत पुष्कळ ठिकाणीं कन्याविक्रयाची अतीशय निंद्य व दुष्ट चाल पुष्कळ दिवसांपासून चालत आली आहे. तें पाहून माझ्या मनांत असह्य दुःखदायक ज्वाळा पेटून अंतःकरण कसें जळून खाक होत आहे. त्याचें सविस्तर वर्णन करण्यास सहस्र जिव्हाधारी बृहस्पतीसारखे विद्वान शक्तिमान नाहींत. असो, पण माझ्या ज्या निरपराधी भगिनी ह्या दुष्ट रिवाजास बळी पडतात त्या पवित्र व निरपराधी अबलांचे ठायीं माझें प्रेम असल्यामुळें त्यांच्या बचावाकरितां मार्ग शोधणें व त्यांवर होणारे जुलमाचें खरें स्वरूप तुम्हांपुढें मांडण्यास मला मोठा आनंद वाटत आहे. व त्या

आनंदास आजच्या सारख्या अपूर्व प्रसंगानें मोठीच शोभा आली आहे. तरी माझे भाषणांतील चांगला तेवढाच भाग आपण घ्याल अशी मला उमेद आहे.

प्रिय बंधूनो, तुह्मीं दयाळू आहांत, विवेकी आहां. परोपकार करण्यांत मागें पुढें पाहत नाहींत. असें असतां तुम्ही आपल्या जिवंत बालिकांना कठोर हृदय करून लोभास वश होऊन थेरड्या व गलितेंद्रिय परंतु विवाहोत्सुक अशा वरांना विकता! व तें पाहून इतर लोक स्वस्थ बसतात. अरेरे, त्यांचे अंगास थरकांप कसा सुटत नाहीं? त्यांचे हृदयांतून दयेनें आपलें ठाणें अजिबात उठविलें काय? खरोखर तसेंच असलें पाहिजे नाहींतर त्यांच्यानें स्वस्थ बसवतेच ना. अरे, गायबकऱ्यांदि मुके जनावरांस देखील कसायापासून सोडविण्यास आपण धांवतों, मग ह्या तर मनुष्य ज्ञातींतील एक प्रधान अंग! "व्याधा श्रेष्ठा मनुष्याणां कन्याविक्रय कारिणाते निर्दया परिश्रेव पुत्रादीषु दया परा." ह्या शास्त्रांतील उक्तीकडे तरी निदान लक्ष पोंचवून अबलांचें दुःखविमोचन करा!! स्वतःच्या मुली निर्दयपणानें बिनदिक्कत विकणें ह्यापेक्षां क्रूर व भयंकर कृत्य तें कोणचें? व अशा नराधमांनां संमति देणारांनां काय उपमा द्यावी? ईश्वरा, अशा पापी प्राण्यांना कांहीं तरी सद्बुद्धि दे. कसाई सुद्धां अघोर कृत्य करितांना कांहीं कचरत असतील. पण देवा, हे त्रिपुंडासारखे कपाळीं मोठमोठे पट्टे ओढून, गळ्यांत माळा घालून, धार्मिक म्हणविणाऱ्या कसायांनां असलीं नीच

कृत्यें करितांना कांहींच लाज वाटूं नये? अरे नराधमांनो, ह्यापेक्षां दारोदार भिक्षा मागून आपल्या पोटाची टीच कां भरीत नाहीं? स्वज्ञातीला व आपल्या कुटुंबाला अवनतीस आणून देशास अधोगतीस आणणारे हरामखोर हेच गुलाम!!! आपल्या स्वार्थासाठीं डोळे असून आंधळे व कान असून बहिरे होतात. परंतु मूर्खांनां समजत नाहीं कीं ज्या देशांत असे दुष्ट रिवाज असतात त्या देशांत सुख, संतति व संपत्ति यांचा लवलेश देखील असूं शकत नाहीं. ही एकाप्रकारची दुर्गंधी असून तिच्या योगानें देव असलेले दूर होतात. व ते गेले म्हणजे विद्या, समृद्धि व शांति यांचेंहीं वास्तव्य नाहींसें होतें. बरोबरच आहे. कारण जेथें निर्दोष बाला रात्रंदिन दीनवाणानें अश्रुपात करून, शिव्याशापांची लाखोली वाहतात तेथें सुखसंपत्ति व शांतता नांदणार कोठून? घरांत अगर देशांत सुखसमृद्धी करावी अशी मनापासून इच्छा असेल तर स्त्रीजाति सुधारा, त्यांचें दुःखविमोचन करा. त्यांनां मान द्या. कारण " यत्र नार्यस्तु पूज्यंते रमंते तत्र देवताः" असें शास्त्रवचनच आहे. आपल्या देशांत सुखसंपत्तीचा अस्त होण्याचें कारण ' कन्याविक्रय ' हेंही एक आहे. इतर सुधारलेले देशांकडे पहा त्यांची सुधारणा हळूंहळूं आपल्याकडे क्वचित् क्वचित् डोकावूं पहात आहे. पण तिचा व्हावा तितका प्रसार अजून झाला नाहीं. सद्यः स्थितीवरून तो दिवसेंदिवस बळावत जाणार हें मात्र खास. व त्याचा स्वीकार आपला समाज मोठ्या

आनंदानें करो अशी आपण परमेश्वराची प्रार्थना करूं या. अहो, गरीब अबलांचें मन नेहमीं कसें कुडकुडत असतें त्याचा मासला पदरूपानें नेहमीं ऐकण्यांत येत असतो. तो तुह्मांस थोडासा निवेदन करून मी आपली रजा घेतों.

पद.

(चाल— भूपती खरें तें)

प्रार्थितों तला मी देवा या समयाला ॥
सद्बुद्धी देई त्या क्रूर अशा जनकाला ॥
लोभांत पडुनि ते विकिती स्वप्रिय तनया ॥
लेशही न वाटे दुःख तरी त्या हृदया ॥
नीचांत असे ते नीच खरोखर जगतीं ॥
वदूं काय मी ज्यास्तीं नर्कवासि ते असती ॥१॥

अंतरा–

विकूनी घरांतिल लक्ष्मी ॥ खरोखरी ॥
जो सकळ जनासही दुःख ॥ दे जरी ॥
दारिद्यासच देती जागा ॥ ते तरी ॥
नको विकूं देऊं त्या अनाथ बालिकांना ॥
ही विनती करितो दे तव ह्या दासाला ॥ २ ॥

यशवंतरावः—प्रमुख साहेब व सभ्य गृहस्थहो, आमचे मित्र कृष्णराव जें कांहीं बोलले तें खरोखरच मोठें लक्ष देण्याजोगें व तितकेंच महत्वाचेंही पण आहे.

कारण जे लोक अशीं कामें करितात व मध्यस्ती करून स्वार्थ साधतात त्यांच्याशीं आपण नित्य व्यवहार करितों. समाजांत ते बिनदिक्कत निर्धास्तपणें खुशाल वावरून सभ्यतेचा आव आणितात त्यांच्याशीं आपला सोयरेधायरेपणाही जडतो. परंतु अशा करण्यानें त्या नीच वृत्तीचे वर्गास उत्तेजन मिळतें व तो वर्ग अधिकाधिक बळावत जातो, तरी समाजानें त्या वर्गास बहिष्कृत केलें पाहिजे व त्यांच्याशीं कोणताही संबंध ठेविला न पाहिजे.

बंधुहो, हजारों अबला आपल्या पितृलोभाचे तडाख्यानें पन्नाशीची झुळुक लागलेल्या व कमर वांकलेल्या वृद्धांच्या धर्मचारिणी पत्नी होऊन आपल्या सुखास जन्माचे मुकतात व लौकरच वैधव्यानलांत तळमळ करित असतांना दृष्टीस पडतात.

हरहर! देवा, ज्या पुण्यशील भरतखंडांत आपल्या सच्छील कीर्तीनें व पवित्र वाणीनें उद्धरून गेलेले व आपल्या वंशजांस उत्तम कित्ता घालणारे उदारधी महात्मे होऊन गेले, त्याच देशांत असे कुलांगार निपजावे; हें खरोखरच आमचें मोठें दुर्दैव !!!

कोणताही सदुपदेश आरंभीं विषाप्रमाणें वाटतो; पण तो कोणास ? जे अज्ञानी व अनभिज्ञ असतात, त्यांना. परंतु आपण सूज्ञ आहां. तेव्हां हें माझें भाषण जरी मनास झोंबण्यासारखें असलें तरी औषध जसें

परिणामीं हितकरच होतें तद्वत् मानाल अशी आशा आहे. पहा,

पद

(चाल—एऽऽऽ माथे मटुकी लई जाऊं)

एऽऽऽ निंद्य किती तरि जगतीं ।
पहा कसे नीच जन जगीं वसतीं ॥ एऽऽऽ ॥
पैसे घेउनि पुत्री देती, दया चित्तीं किंचित येती
पाषाण हृदयीं असती ॥ ते ॥ ऽऽऽ ॥

असो. जेवढें विवरण करावें तेवढें थोडेंच आहे.

गोविंदरावः—सभ्यगृहस्थहो, पहिले दोन वक्ते जें कांहीं बोलले, तें चांगलें असो वा वाईट असो. माझें मत मात्र त्यांच्या विरुद्ध आहे. कन्याविक्रय करणें अश्लाघ्य आहे असें कांहीं लोक प्रतिपादन करितात; परंतु मी ह्मणतों कन्याविक्रय कां करूं नये? अहो असें पहा, एखाद्यानें आंब्याचें बी लावून आंबा वाढविला तर त्यानें त्याचीं फळें विकूं नयेत काय? किंवा शेतकऱ्यानें आपलें शेतांतील धान्य ज्यास्त किंमत देणारास विकूं नये तर काय कमी किंमत देणारास विकावें? तसेंच कन्याविक्रयाचें आहे. अहो, कन्या ह्मणजे बापानें लाविलेल्या झाडाचें फळ किंवा शेतकरीरूपी बापानें आपल्या मालकीच्या शेतांत उत्पन्न केलेलें धान्यरूपी कन्याधन. तें कन्याधन धान्याप्रमाणें ज्यास्त पैसे देणारास विकलें तर बाप काय दोषी झाला?

अरे वाहवारे ! ह्मणे कन्याविक्रय करूं नये !! कन्या तर देश संपन्न करण्याचें मुख्य साधनच आहे. ज्यास कन्या ज्यास्त त्यावर तर ईश्वराची मोठीच कृपा समजली पाहिजे. ह्या बेट्यांना हें कोठें समजतें, त्यांचें तर्कशास्त्र ह्मणजे अगदींच कोतें ! तेव्हां मी बेधडक असें म्हणण्याचें धैर्य करितों कीं, कन्याविक्रय करणें ह्मणजे फार चांगलें. त्यानें मनुष्य फार श्रीमंत बनतो व त्याचे घरीं सर्वत्र लक्ष्मी वास करिते. तरी माझे मित्रांनों, तुम्हीही असेंच मत द्याल अशी मला फार आशा आहे. अहो ह्मटलेंच आहे ना—

दोहा

खा पिलाया रात दिन, शिकाया दे धन ।
फुकट देना किसिने कहा, कच्छूं विचारो मन।
पैदा कीया ईसदेसमे, फल मिट्ठे सब काज ।
चखना इसको सबहिने, छोटेवडे सुनो आज ।
लडका लाय कमायके, और करे बापकी सेव ।
लडकी कभूं न लायगी, वो तो परघर देव॥१॥

विनायकरावः—महाशयो, माझ्या पूर्वींच्या वक्त्यानें व्यर्थ बोलून माझ्या मनास दुखविलें असें तुह्मांस वाटणें हें साहजीकच आहे. तें ऐकून मनास खेद वाटणें अगदीं रास्त आहे. असमंजस लोक स्वतःच्या स्वार्थाकरतां काय करितील आणि काय नाहीं याचा मुळींच नियम नाहीं. जगांत विशेष प्रकारचे कन्या-

विक्रय करणाऱ्या लोकांपेक्षां जे हे त्यांस पुष्टी देणारे लोक तेच दुराचारी व समाजघातक असतात. मुलीस गहूं, बाजरी वगैरे शब्दांची उपमा देतांना मनास कांहींच शरम वाटावयास नको काय? वाहवारे सभा आणि त्यांत बोलणारे विद्वान वक्ते! धन्य त्यांची!! ' कुणबी जास्त किंमत घेऊन धान्य विकतो त्याचप्रमाणें मुलगी विकावी ' असले अभद्र, बीभत्स, निंद्य व पाजी शब्द उच्चारणाऱ्या व समाजविघातक विचाराचा प्रत्यक्षपणें फैलाव करणाऱ्या वक्त्यांस ' वक्ते ' ह्मणावें किंवा काय ह्मणावें तेंच समजत नाहीं. त्यास अनेक कोश शोधिले तरी नांव देणें-योग्य-कोणासच साधणार नाहीं. अशा प्रकारचे नासके सभासद असले म्हणजे दुधांत मिठाचा खडा पडल्याप्रमाणें सर्व सभेस काळिमा लागणार! किती नीच कृत्य हें कीं जें पशूसही साधणार नाहीं!!!

असो. बोलणारांचें तोंड थोडेंच धरवतें आहे. एका ठिकाणीं म्हटलें आहे: प्रयत्न केल्यानें वाळूचें तेल निघेल, तृषिताची तहान मृगजळानें भागूं शकेल; परंतु मूर्ख मनुष्याचें हृदय तिळभरही धरतां येणार नाहीं.

माझें इतकेंच ह्मणणें आहे कीं, कन्याविक्रयासारखें दुसरें पाप नाहीं. गोमांसापेक्षांही भयंकर तें आहे. कारण गोमांस विकणारे खाटकी निर्जिव मांस विकतात. परंतु हे जिवंत प्राण्यांचे साडेतीन हात देह विकतात व ते विकतांना तिच्या जिवाची संमति सुद्धां घेत नाहींत. परंतु

त्या मांगांचें हृदय फारच कठीण. त्यांचे पुढें प्रत्यक्ष ब्रम्हदेवानें जरी कंठशोष केला तरी व्यर्थ. देवा, असलीं कूप मंडुकें ह्या आमच्या हिंदवासी जनांत कशाला रे उत्पन्न केलीस ? असल्या पाषाण हृदयी लोकांनीं व्यर्थ आपल्या आईची कूस शिणविली व भूस आपला भार वहावयास लाविलें! अरे चांडाळांनो कन्याविक्रय किती भयंकर पातक आहे. याची तुम्हांस कल्पना तरी आहे काय? एका महात्म्यानें म्हटलें आहे —

श्लोकः-हृदयं भक्षन्ति माता पिता शिरैव च
बांधवाःपाणिपादौ च रुधिरःत्वितरे जनाः ॥ १ ॥

वरील श्लोकाचा अर्थ-जो कन्या विकतो तिची आइ मुलीचें काळीज, पिता शिर, व भाऊ हातपाय खातात आणि त्या मांडवांत जेवणारे तिचें रक्त पितात. शिव! शिव!! धिक्कार असो!!! वरील शब्द ऐकतांच कोणाच्या अंगावर रोमांच थरारणार नाहींत ? माझे तर हात पाय लटपट कापूं लागले व डोळ्यांतून आसवें पडतात. निरपराधी अबलांची केंविलवाणी स्थिति पाहून आपण जिवंत तरी कसें राहिलों हेंच मला समजत नाहीं. कन्याविक्रय करणारे तिचे बाप नव्हत, भाऊ नव्हत, आईही नव्हे. कारण शास्त्रवचनच आहे —

श्लोकः माता नास्ति पिता नास्ति नास्ति
बंधू सहोदराः॥
त्रयस्ते नरकम् यांति कृत्या दुहितं विक्रयाः ॥ ॥

हर हर, कन्याविक्रयाचें द्रव्य इतकें अपवित्र आहे कीं, त्यास शिवणें सुद्धां पाप आहे, मग त्या द्रव्यावर उपजीविका करणें यास कोणती उपमा द्यावी हें समजत नाही. सांगितलें आहे कीं.

श्लोक—भक्षितं चाणु मात्रंतु कन्या विक्रयजधनं
सकुलतं गृहितारं नरकंनयति धृवं ॥ १ ॥

कन्येचें द्रव्य जो यत्किंचित भक्षण करितो तो कुटुंबासह नरकास जातो. कारण—

पद.

चाल—लगे ये नयन मोरे शरमान

देखो तुम कैसी बुरी रीत जगतमें चली रही रे
बेचे नाहक ये फरजंद जिगरमें कच्छू नहीं रे
पथरसी छाती भईरे
दया तो निकल गई रे
देखो मेरे तनका दिल कैसा जलता क्या... कहूं
नहीं कोई सुनता दिल कैसा जलता क्या .. कहूं
कयसी खोटी प्रीत .. देखो ॥१॥

शेर

कहेतेही हे लडकी बडी अबब्याह होना चाहिये
अपनेकू देगा बहोत जर उनकूही देना चाहिये
नहीं हो जिसिके पास झर उनकून देना चाहिये
बुढ्ढाही हो मरनेमे हो उनक न छोडा चाहिं
बने ये कैसे क्रूर कपूत ॥ देखो ॥ १ ॥

नारायणराव:-देशबांधवहो, विनायकरावांचे विचार म्हणजे कोणाला मान्य होतील असें मला वाटत नाहीं. कारण विनायकराव पडले सुधारक. सुधारकांचें काय तें येऊन जाऊन ते हीच चर्पटपंजरी म्हणत असतात. अहो, एखाद्या मनुष्याजवळ अपार संपत्ति आहे; आणि त्यास बायको नसली, तर त्या धनाचा काय उपयोग ! मी म्हणतों अलबत एक नव्हे दोन-चार बायका कराव्या. मला असें निःसंशय वाटतें कीं, वंशविस्तारा करितां मुख्य साधन कन्याविक्रय हेंच होय, व त्याप्रीत्यर्थ वाटेल तेवढा पैसा खर्च झाला, तरी बेहत्तर आहे! पण हे सुधारक कंबर बांधून पुढें येताहेत. परंतु ते देशाचें कल्याण करणारे नसून देशद्रोही आहेत असें पक्कें समजावें. पैशाशिवाय प्रिय वस्तु दुसरी नाहीं. परंतु ती जर योग्य कारणाकरितां खर्च होते तर त्यांत काय बिघडलें. असें पहा, कर्ज काढून कन्यादान करण्यापेक्षां कन्या विकून कन्येचेंच दान दिलें तर काय वावगें आहे? ही रीत दोन्ही पक्षांचे संमत्तीवर अवलंबून असते. कन्या एवढ्याचसाठीं जन्म घेतात कीं, आपले बापआई व बंधू यांना दारिद्र्यांतून मुक्त करावें व त्याचे आईबापांचे मनांत ईश्वरी संकेताशिवाय कां अशी बुद्धि उत्पन्न होते ? अहो, हे सुधारक विनाकारण कंठशोष करून बहकत सुटतात (सभेंतून शेम शेम, बाहेर काढा.बंद करा असा गलबला होतो.)(धिःकार, बेशरम वगैरे बोलून जबरदस्तीनें खाली बसवितात.ऑर्डर ऑर्डर म्हणून दुसऱ्या वक्त्यास बोलण्यास परवानगी मिळते.)

आनंदराव—सभासदहो, माझें भाषण आपणांस प्रिय वाटो अगर अप्रिय होवो. त्याची मला यत्किंचित् काळजी नाहीं. जें खरें व निःपक्षपाती असेल तें सांगणें माझें कर्तव्य आहे. आपणांस युक्त असल्यास आपण माझा गौरव कराल व अयुक्त असल्यास उलट मलाच उपदेशामृतानें समजून द्याल. ह्या जगांत पुष्कळ धंदे आहेत. व्यापार आहेत. अनेकप्रकारच्या कला आणि विद्या आहेत आणि द्रव्यार्जनाचे अनेक उपायही आहेत. सन्मार्ग सोडून आपल्या कन्यांचा विक्रय करून त्यांना कुरूप व विजोड नवऱ्याची सांगड देऊन त्यांना जन्मभर दुःखसागरांत गटंगळ्या खावयास लावून आपण श्रीमंत होण्याचा अति निंद्य, विघातक आणि दुष्ट मार्ग स्वीकारणें ह्मणजे किती नीच वृत्ति आहे? वास्तविक आपल्या कन्येस रूपानें गुणानें वयानें व कुळानें योग्य पति करून देणें हें प्रत्येक बापाचें कर्तव्य आहे. कारण तोच मार्ग शास्त्रसंमत आहे. एके ठिकाणीं ह्मटलें आहेः—

शार्दूल.

विद्या शौर्य धनाश्रयो गुणनिधी ख्यातो भवा सुंदर ।
आचार सकुलोद्भव मधुर वाग्दाना दया सागर ।
भोगी भूरि कुटुम्बवान स्थिरमती पापार्थ हीनावली ।
जामाता परि पराणित कविवरें रेवं विद्यः सताम् ॥ १ ॥

वर श्लोकांत वर्णन केल्याप्रमाणें जामात करणें कोणीकडे आणि ज्याचे कान-नाक डोळे गेले आहेत,

दांत पडले आहेत, गाल बसले आहेत असा तेजहीन व वर्णहीन जामात कोणीकडे? त्यास आपली लावण्यवती व गुणवान कन्या देणें म्हणजे मोठें अघोर कृत्य होय. बिचारीच्या सुखदुःखाकडे लक्ष कोण देतो? आपला तळीराम गार झाला म्हणजे झालें.

जोंपर्यंत पति-पत्नीचें एकचित्त होत नाहीं, एक जें करितो तें दुसऱ्याला आवडत नाहीं अशी स्थिति जों-पर्यंत असते, तोंपर्यंत त्यांचा गृहस्थाश्रम सुधारत नाहीं. कारण संसाररूपी गाड्याचे पति आणि पत्नी अशीं दोन चाकें आहेत व दोन्हीही जेव्हां सुरळीत चालतील तेव्हांच तो गाडा सुखावह आपला मार्ग क्रमील. आ-पली अशी खात्री असलीच पाहिजे कीं, ही दुष्ट रीत बंद पडली, तर आपल्या देशाची स्थिति सुधारेल, समाजांत संतति दृढ निपजेल, विधवांची संख्या कमी होईल.

महाराज, आपण यःकश्चित पैशा दोन पैशांकरितां भाजी घेतांना किती चिकित्सा करितों? मग ज्याचे बरोबर आपल्या कन्येचें सारें जीवित कंठावयाचें त्या-विषयीं आपण किती दक्षतेनें काळजी घ्यावयास पाहिजे. परंतु तें एकीकडे राहून त्या बाबतींत आपल्याकडून किती दिरंगाई होते! म्हातारा, निर्बल, रोगी असा नवरा पाहून दिल्यानें मुलगी सुखी होईल काय? नाहीं. जामाताजवळून पैसे उपटून त्यास कफल्लक करून त्याचे जवळून आपली बाळा काय सुख पावेल? असले

बाप ह्मणजे मुलींचे केवळ वैरी होत. त्यांचे छायेला मुद्धां शिवणें पाप आहे. तरी दुष्टांनों, कांहीं तरी दया येऊं द्या व मुलीला योग्य अशाच वरास द्या.

श्लोकः–कुलं, श्रुतं, धनं, रूप वय श्चद्विगुणंस्वलः।
परीक्षयच सुतां दद्यात नान्यथाच कथाचन॥१॥

कुळ, विद्या, धन, वय वगैरे पाहून कन्या अर्पण करावी. वरील गोष्टींकडे जो दुर्लक्ष करितो तो मूर्ख.

साकी.

नीच कसायासम पित्यांचा मनांतील हेतू।
काढुनि देई सद्‌बुद्धि जरी होउनि त्यांचा भदू।
ईशा ह्या समया, देवो सत्य असे तें तया॥१॥

प्रमुख (अध्यक्ष) :—सद्‌गृहस्थहो, कन्याविक्रयास अनुकूल व प्रतिकूल अशीं बरींच भाषणें येथें झालीं. त्या सर्वांचे मतिर्थावरून कन्याविक्रय न करणें हेंच फायदेशीर आहे असें आपणांस खात्रीनें वाटेल व माझेंही पण तसेंच मत आहे. कारण कन्याविक्रयानें समाजाची, आपल्याच कन्यांची अनेक दिशांनीं भयंकर हानी आहे. यासंबंधानें बऱ्याच वक्त्यांचीं सु-विचारपरिप्लुत अशीं भाषणें झालेलीं आहेत. सबब ज्यास्त विचार करण्याचा माझा मानस नाहीं.

आपण मानवी प्राणी इतर प्राण्यांपेक्षां ज्या बुद्धि-

बळानें, ज्ञानबळानें व शारीरिकबळानें श्रेष्ठत्वास प्राप्त झालों आहों त्याचा दुरुपयोग करून समाजघातक, अति निंद्य व तोंडास काळिमा आणणारा असा कन्याविक्रय करून स्वतः श्रीमंत होण्याची दुष्ट महत्वाकांक्षा तुह्मांस कशी सुचली? केवळ स्वार्थाकरितां प्रत्यक्ष पोटच्या गोळ्यास दुःखसागरांत बुडूं देणाऱ्या बापांना धिक्कार असो.

बंधूनों, आपण पुष्कळ परिश्रम घेऊन विद्वत्तेनें भर, पूर व बोधप्रद असा भाषणरूपी प्रदेश सुपीक केलात-हें पाहून कोणत्या सहृदय माणसास आनंद होणार नाहीं? व त्याबद्दल मीही तुमचें अंतःकरणापासून अभिनंदन करितों.

मात्र आज झालेल्या सभेंत एक खेदकारक प्रसंग झाला व तो हा कीं, वक्त्यांवक्त्यांचीं परस्पर विरोधी भाषणें होऊन अगदीं मारामारीपर्यंत पाळी आली! प्रत्येक गोष्टींत मतभेद हा असावयाचाच. परंतु त्यांत व्यक्तिद्वेष मात्र नसावा.

असो, झाली गोष्ट पार पडली. परंतु आजच्य एकंदर सभेवरून सर्वांनीं जो बोध घ्यावयाचा तो हाच कीं, कन्याविक्रय सहसा करूं नये. त्योपक्षां मुलगी एखाद्या वराला नुसतीच अर्पण करावी.

तरी बांधव हो, ह्या ठरावाविरुद्ध ज्यांचें मत असेल

त्यांनीं हात वर करावे (कोणीही हात वर करीत नाहीं.) शाबास मित्रांनों, आजच्या सभेनें बराच कार्यभाग झाला. आतां मी सर्वानुमतें असा ठराव कारितों कीं, " कन्याविक्रय करूं नये, तो करणारास समाजांतून बहिष्कृत केलें जाईल. त्याचप्रमाणें कन्या-विक्रयास अनुमोदन देणारासही समाजाकडून भयंकर शिक्षा व्हावी. " (टाळ्यांचा कडकडाट होतो) येणेंप्रमाणें ठराव करून आजच्या सभेचें काम निर्विघ्नपणें पार पडलें म्हणून सर्वांचे आभार मानून मी आपली रजा घेतों.

सर्वजण:-(उभें राहून)

पद.

चाल—(परमार्थाचा हा पंथ)

तुम सूनो भया कन्या-विक्रय नहि करना ॥
रीत बूरी देखो कैसी ।
चलतीच हय हटती न कयसी।
बहोत बहोत जर लेना देना ।
कभूं न लेना, कभूं न देना ।
नर्कका, समजना, नहि धरना–तुम ॥ १ ॥
क्या किस्मत की ये बलहारी, बेचाहि जर लेकेहि
भारी रहितीच नाहि दौलत सारी, तगदीर फूटा
रोतेही बयठा, उससेचना, खूब मानना, नही बेचना
तुम ॥ २ ॥

प्रवेश ५ वा.

स्थळ-सदाशिवरावांचें घर.

पात्रें:—सदाशिवराव, शंकरशास्त्री व विष्णू दलाल.

सदाशिवराव:-आज दहा दिवस झाले. त्या विष्णू दलालाचा अद्याप पत्ता नाहीं. मला बिलकूल स्वस्थता नाहीं. मला असें झालें आहे कीं, हें घर कव्हां नवीन कुटुंबानें शोभलेलें पाहीन? ईश्वर करो नि असा सुदिन लवकर येवो व मला उत्तम तरुण व रूपवान अशी नवरी मिळो. खरेंच देवा, असें झालें म्हणजे तुझे उपकार जन्मभर विसरणार नाहीं. [शंकरशास्त्री व दलाल प्रवेश करितात.]

शास्त्री व विष्णू:—नमस्कार शेटजी.

सदाशिवराव:—नमस्कार या बसा. काय विष्णूपंत आपल्या कामाबद्दल उजवी अगर डावी? बरेच दिवस लाविलेस म्हणून जरा शंका वाटते.

विष्णू:-डावी? अहो हा पठ्ठ्या स्वतः गेला नि हिरमुसलें तोंड करून आला असें कधीं तरी होईल काय? अहो अगदीं नक्की. लांब कशाला हे तुमचे श्वशूर शंकरशास्त्री बरोबरच आणिले आहेत. ह्यांचीच मुलगी. मुलगी पण मुलगी. निवळ सोळा वर्षांची तरुणबांड अशी कळी आहे! काय ते पाणिदार डोळे

लांब व कुरळ काळेभोर केंस, वक्र भृकुटी, तें सरळ नाक, कुंदकळ्याप्रमाणें दांत, हंसत मुख व भव्य चेहरा व सदृढ अशी आंगकाठी पाहून अपसरांनाही तिचा हेवा वाटेल.

सदाशिवरावः—अरे वा, मग तर मोठेंच नशीब उदयास आलें म्हणावयाचें. जें आवडतें तेंच पदरीं पडलें. बरें पण मुहूर्त केव्हांचा ठरवता? लवकर ठरवा काय सांगू अगदीं चैन पडत नाहीं.

विष्णूः—हो. हो. आणि हें जाणूनच परवांचा मुहूर्त ठरविला आहे पण—

सदाशिवरावः—पण काय?

विष्णूः—हुंड्याबद्दल सोळा हजार रुपये ठरविले असून ते परवांच रोख दिले पाहिजेत.

सदाशिवरावः—हां तिच्या, इतकेंचना. आत्तां देतों.

(जातो.)

विष्णूः—पाहिलेंत कां कसे आहेत सावकार? संपत्तीचें केवळ आगर.

शंकरशास्त्रीः—दिसतेंच आहे. मला तुझी खात्री आहे म्हणूनच कबूल केलें,

सदाशिवराव: --(रुपयांची थैली घेऊन त्यांतून रुपये मोजतात.) घ्या हे रुपये. रुपये पावल्याबद्दल कांहीं पुरावा द्या. (शंकरशास्त्री रुपये मोजून घेतो व स्टँपावर लिहून देतो. कागद वाचून पहातो) रा. रा. सदाशिवराव मार्तंड पुणेंकर यांसी लिहून देणार शंकरशास्त्री चिपळूणकर लिहून देतों कीं, माझी मुलगी नामे सुंदरी उमर वर्षें सोळा हिचें तुमच्याशीं येत्या गुरुवारीं लग्न करून देऊं. त्याजबद्दल आज रोजीं तुमच्यापासून रोख रुपये सोळा हजार नगदी घेतले आहेत सही शंकरशास्त्री चिपळूणकर. साक्ष विष्णुपंत दलाल. बरोबर आहे. झालें. करा तयारी लग्नाची.

शंकरशास्त्री:—बरें तर येतो. (जातो)

सदाशिवराव:---दलाल पण दलाल खरा दलाली करावी ती अशाच लोकांनीं कीं अगदीं कामाची फत्ते झालीच पाहिजे.

विष्णू: - आज सारखे दहा बारा दिवस मध्यंतरीं अगदीं रिकामे गेले पण कोठें कांहीं आमची डाळ शिजेना. अहो. परमेश्वरास आमची मोठी काळजी कालच यांच्यासारखे लोभी कूळ मिळालें. आतां सदाशिवराव, आमची मेहेनत वगैरे द्या लागलीच. (दलालीचे रुपये घेतो व जातो.)

सदाशिवराव:—परमेश्वरानें मोठीच कृपा केली.

साकी

ईशकृपेनें पूर्णच झालें मनांतील मम हेतू ।
कार्य त्वरित झालें सत्वर कृपा केली बा तूं ।
ऋणि झालों तुझा । आतां नसे दुजी आशा॥ १

[जातो

प्रवेश ६ वा.

स्थळ—रस्ता.

पात्रें:—चंद्रिका, यमुना व सुंदरी.

चंद्रिका: — ह्या जगांत द्रव्याशिवाय कोणी कोणास ओळखत नाहीं. त्याशिवाय एकही वस्तु जगांत प्रिय नाहीं. आह्मां मुलींना, हे कठोर हृदयीं बाप खुशाल विकून आपला तळीराम गार करितात. कितीही सांगावें, रडावें, जीव देण्यास जरी तयार झालें तरी त्यांच्या हृदयांत यत्किंचितही दयेचा पाझर फुटत नाहीं. निवळ पैसे मिळावे म्हणून आमचे किती हाल करितात! त्यांना आमच्याशीं जणूं कांहीं कर्तव्यच नाहीं, एकदांची विकली, कीं झाले ते निसूर मग वर मरो अथवा कन्या मरो, हुंडा मिळाला कीं बस झालें. हुंडा मिळाल्यावर निवळ पोळासारखे हिंडत फिरतात व रिकामटेकड्या लोकांशीं गप्पा मारीत असतात कीं, आमची मुलगी अमुकअमुक ठिकाणीं श्रीमंताच्या घरीं पडली आह्मांस

अमुक रुपये हुंडा मिळाला. देवा, आमचे केवढे हाल ! केव्हां ही दुष्ट चाल बंद पडेल? व आमच्या सारख्या गरीब गाई दुःखांतून केव्हां मोकळ्या होतील ?

पद.

चाल:-(अन्या सुधन्या सभाग्या अशा)

अन्या कोठेंही अभाग्या अशा ॥
न सांपडतील मुली फारशा ॥

शिकवूनी पढवूनी गुणवान केली, देतात वृद्धा कशा, पहाहो । संतति संपत्ति जाउनि विपत्ति येईल हें समजा, खचितची । वृद्धहि मरुनिही परलोकीं जाती, मुलिंची काय दशा, पहातरी ॥१॥

[यमुना येते व त्यामागून सुंदरी येऊन एका बाजूस उभी राहते]

यमुनाः—कां चंद्रिके, इतका विचार कसला चालला आहे ? पण हो, आज तूं कांहीं नवीन बातमी ऐकली कां?

चंद्रिकाः-कसली ग माहिती? मला बाई नाहीं माहीत, सांग तरी तूं.

यमुनाः—मी काय सांगू ? तुझें चित्त स्वस्थ असेल तर ना, तूं तर मोठ्या विचारांत गढलेली दिसतेस.

चंद्रिकाः—कांहीं नाहीं माझें चित्त वगैरे स्वस्थ आहे तूं सर्व सांग मी लक्ष देऊन ऐकेन.

यमुनाः—(सुस्कारा टाकून) ती बिचारी सुंदरी !

चंद्रिकाः कोण ? ती शंकरशास्त्र्यांची तर नाहीं ना ?

यमुनाः—हो हो. तीच ती. तिच्या बापानें तीला एका म्हाताऱ्यास विकलें आहे.

चंद्रिकाः–काय ? थेरड्यास विकलें ? तरी पण मला पूर्वीं असंच वाटलं होतं की, शंकरशास्त्र्यानं एवढी जी तिला वाढविली ती उगीच नाहीं! अरेरे, बिचारी-चें नशीब फुटलें, काय दशा होईल तिची कोण जाणे.

यमुनाः–अग, मला तर वाटतं कीं तो सुंदरीचा बाप नसून पूर्व जन्मीचा वैरीच होय! त्याला ' कन्या-विक्रय ' सभासदांनीं पुष्कळ उपदेश केला, अनेक रीतींनीं त्यास समजून सांगितलें. परंतु त्याचा एकच नन्नाचा पाढा. त्याच्या डोक्यांत पक्कं शिरलं कीं, जो आपल्याला ज्यास्त पैसे देईल त्यास आपली सुंदरी विकावी. मी सुंदरीचा मालक, तिचें वाटेल तें करीन ही त्यास मोठी घमेंड आहे. त्यावर ते बिचारे स्वस्थ बसण्यापलीकडे काय करणार ? इतका तो निर्दय कीः–

पद.

चालः– (नीतीमंत नीति असी मातृदेवता.)
निर्दय तो किति असेच ह्याच भूवरी ॥

एक चित्र बघ कसाहा विकण्यापरी ॥
विकिली ही ती वृद्धासकीं सुंदरी ॥
सांगु काय मजहि वाटे दुःख किति तरी ॥
पाप काय होई त्यानें ह्या महीवरी ॥
कळे न काय किंचित त्या मुढासही जरी ॥१॥

(दुःख करीत उभी राहते)

सुंदरीः—[एका बाजूनें सर्व ऐकून] (स्वगत) मला माझ्या बापानें थेरड्यास विकलें? असें ह्या दोघींच्या बोलण्यावरून दिसतें. माझा बाप कांहीं इतका अविचारी नाहीं. कारण माझ्या बापाचें मजवर किती तरी प्रेम, छे, तसें कधींही होणार नाहीं. (विचार करून) पण नाहीं ह्मणून कसें ह्मणावें ? ह्या पैशाचे लोभास बळी पडून मोठमोठे मी ह्मणणारे देखील अविचाराचीं कृत्यें करितात. म्हणून बाई भीति वाटते, माझ्या बापाची सुद्धां बुद्धि फिरली नसेल कशावरून? देवा, तसें झालें तर खरोखरच मी मोठी, अभागी ! असो ह्या काय बोलतात तें तर ऐकूं.

चंद्रिकाः—कांग, तुला तर सर्व कांहीं ठाऊक आहेसं दिसतं, पण शंकरशास्त्रयानें हुंडाबिंडा कितीक घेतला?

यमुनाः-हें बघ. तो नांवाचा शंकरशास्त्री, असा तसा सामान्य का तो आहे? त्यानें सोळा हजारांपेक्षां

एक पैही कमी घेतली नाहीं. सर्व कांहीं झालं! स्टांप सुद्धां लिहून पुरा झाला.

चांद्रिकाः-आँ! स्टांप सुद्धां लिहणं झालं? आतां बाई अगदीं नक्कीच झालं म्हणायचं. बरें लग्न कधींचं ठरलं?

यमुनाः—कांहीं लांब नाहीं. परवां गुरुवारीं गोरज मुहुर्तावर.

चांद्रिकाः—हाय रे देवा! आम्हां स्त्रियांचा जन्म अगदींच व्यर्थ!! आमचे काय काय हाल होतील नि काय नाहींत न कळे. अरे न्यायनिष्ठुर ईश्वरा, आम्हांवर असले जुलूम होतात ते तुझ्यानें पाहवतात तरी कसे? त्या दुष्टांना कांहींच शासन तूं करूं नयेस? काय, परवां तो कसाई सुंदरीच्या गळ्यांत दावें बांधून त्या कसायाचे हवाली करणार? बाई मला तर तो यमासारखाच दिसूं लागला आहे—

पद.

चालः—खरि खरी, खरिच ही कामलता.

खरा खराच वाटे नरयम तो ॥
ग्रासिहि पोटांत बाळगितो-खरा ॥
किमपिही केव्हां दया न येई-करीं ती घेई ॥
मारुनि देई, कशी पहा ही ॥

क्रोध न त्याचा क्षणिं कधीं शमतो ॥
पहाहो क्षणीं कधीं शमतो ॥ १ ॥

(दोघीही जातात.)

सुंदरीः—झालं, यांच्या भाषणांवरून नक्की अगदींच नक्की झालें? म्हणायाचं! त्या तरी खोटं काय म्हणून बोलतील? त्यांनीं जें ऐकलं तें सर्व कांहीं खरं आहे. देवा, झाला अंत. आतां बाबाला आईला नव्हे, कोणलाच काय सांगून फायदा आहे! माझे सुखाचे दिवस गेले! देवा, मी पूर्वजन्मीं असे कोणते भयंकर अपराध केले कीं मला तू छळतोस. पण देवाला तरी दोष काय म्हणून. माझें नशीबच हें. अरे लोभिष्टा निर्दया जनका, तुला यत्किंचित्‌ही दया आली नाहीं?

पद

(सिंध जिला–ताल–दादरा.)

ईशा कैशी बुद्धि दिली कां ऐशी सतविता
अशी कां मला ॥
ताता तुमची मती कशी फिरली ॥
प्रेमा दावूनि वृद्धा कशी विकली ॥
विकिली कांहो पोरी, मारिली गुप्त सुरी ॥
कां मजला फसवितां कोणाशीं-कां ऐशी-ईशा ॥
विष पिउनि तरी प्राणच देऊं काय ॥
ऐसें झालें कठोर कैसें हाय ॥

सोडून गेली ही माय-झालि गरीब ही गाय ॥
सांगाकीं, कोणितरी, ताताला, मजविषयीं
इशा ॥ १ ॥

(शोकाकूल अशी गात जाते)

(पहिला अंक समाप्त)

अंक २ रा.

प्रवेश १ ला

स्थळ—शंकरशास्त्री यांचें घर.

पात्रें:-सुंदरी व शंकरशास्त्री.

सुंदरी:-आई, मला दुःखसागरांत लोटून तूं कां स्वर्गास गेलीस ? मला एकटीला अनाथासारखें सोडून तुला जाणं योग्य दिसेल काय ? मला माझ्या जन्माचे पोवाडे सांगण्याकरितां तुझ्याशिवाय जगांत कोण उरलें आहे ? कोणीही नाहीं. माझं जगांत असं एकहीं प्रेमाचं माणूस नाहीं कीं, मी त्याचे जवळ माझं दुःख मांडून शांतवन करून घेऊं. काल माझ्या त्या मैत्रिणींचं भाषण ऐकलं तेव्हां पासून मला बाई चैन पडेनासं झालं आहे. मला आतांच मृत्यु कां बर येत नाहीं. बाई भूमाते, तूं तरी दुभंग होऊन ह्या तुझ्या अनाथ व दुखानें होरपळलेल्या आपल्या बाळेस पोटांत घे कारण

आतां तूंच माझी सखी आहेस! ह्यावेळीं ह्या जगांतील सर्व लोक स्वस्थ कसे बसतात? अरे ह्या अबलांचें दुःखाकडे थोडें तरी लक्ष द्या. आणि त्यांनां ह्या भयंकर प्रसंगांतून सोडवा. इंग्रजी राज्य किती दयाळू म्हणवतं पण तें सरकारही ह्या बाबतीत कांहींच कडक प्रतिबंध करित नाहीं. अखेरीस देवा तुझ्याशिवाय आम्हांस कोणीही वाली नाहीं. तरी हे दयाघना, लवकर सुटका कर.

पद.

चाल–(जेलखानेका दरोगा पकडबांइरे.)
ईशा धांवा करितें तूझा सोडिव तूं तरी ॥
ध्यानीं, मनीं स्वप्नीं जें नव्हतें तेंचि पुढें आलें ॥
लहानपणापासूनि शिकवुनी म्हाताऱ्यास दिलें ॥
सोळा हजारच खरे घेतले नगदी ॥ ईशा ॥
जननी माझी स्वर्गी गेली, लोटोनी मजला ॥
दुष्ट कसायासम पिता हा क्रूर कसा झाला ॥
कोणी राहिलें न तुझ्यावांचुनि वाली ॥ ईशा ॥
देवा आतां धांवुनि, येऊनी कन्या तव करीं घे ।
रुसला असा कां मजवरी, तरी धांवुनि सत्वर ये
धरणी माता जागा मला तूं दे ग खरी ॥ईशा॥१॥

काय करूं देवा, आत्तां तो बाप येईल.

शंकरशास्त्रीः—कां बाळे सुंदरे, तुझा कोमल मुखचंद्र आज कां बरें उतरला आहे. कोणी कांहीं बोललें

बिघडलें तर नाहीं ना ? बरें तुझ्याकरितां चांगले श्रीमंत असें स्थळ पाहून तुझे लग्नाचा बेत केला आहे. तो तुला कळलाच असेल म्हणा, परंतु मी आपलें सांगून ठेविलें. तेव्हां अशा मंगल प्रसंगीं तूं अशी दुर्मुखलेली व उदास कां आहेस ? बाळे, बोल ?

सुंदरीः—काय बाबा, मी रडतें असें कां तुम्हाला दिसतें ? हें तर माझं मोठेंच नशीब ! अहो मी रडत नसून माझ्या कर्मास हंसत आहे.

पद.

चाल—सदर प्रमाणें.

कर्माचि फुटलें माझें ह्मणोनि हंसतें मीही तरी ।
दोष कुणाला द्यावे कसले चक्र हें फिरतें जरी ।
मज सुचे नच कांहीं करावें कीं ॥ ईशा ॥१॥

शंकरशास्त्रीः—मला तेंच हवें. ईशकृपेनें अशीच हंसत रहा म्हणजे झालें.

सुंदरीः—बाबा, आतां माझ्यानें बोलल्याशिवाय रहावतच नाहीं. किती दुःख सोसूं ? आतांपर्यंत कसें तरी दुःख दाबून ठेवलें. परंतु हल्लीं त्याचा स्फोट प्रगटत आहे. त्याची मला माफी असूं द्या.

चालः–[भूपती खरें तें.)

सांगतें तुम्हां मी निर्लज्ज होऊनि ताता ।
मज क्षमा करावी विनंति करी जोडि हाता ।

कां दिधलें तुम्ही हो क्रूर बनुनि त्याला ॥
जो दो दिवसांनी खचित सोडि जगताला ॥१॥

अंतराः —

लहानांतूनि मोठी केली -सुंदरी ।
श्रम घेऊनि जरी शिकविली सुंदरी ॥
ममता कशी किती केली सुंदरी ॥
परी तींहीच वाटे शत्रु खरोखरी भारी ।
जरि मित्र मानतां कां देतां स्मशानी ॥१॥

शंकरशास्त्रीः —बाळे असें अभद्र काय बोलते आहेस तें ?

सुंदरीः —बाबा अभद्र नाहीं तर काय ? त्या स्मशानगत झालेल्या म्हाताऱ्याचे गळ्यांत मला नकाहो बांधू ?

शंकरशास्त्रीः —मुली,त्यांत तुझं हितच आहे. अग खुळे, चांगली श्रीमंताच्या घरीं पडशील. मी काय तुझें वाईट करणार आहे ? कांहीं तरी मला तुझी काळजी आहेच. आतां काय त्याचं रुपये मोजून घेतले, मुहूर्त नक्की केला.

सुंदरीः-बाबा, माझं खरंच बरं व्हावं असं तुमच्या मनापासून असलं तर आणलेले रुपये परत द्या कसे. पण हा संबंध करूं नका.

शंकरशास्त्रीः —पोरी, तुला कांहीं समजतें आहे कां ?

कसं योग्य अगदीं लायक स्थळ शोधलं आहे. श्रीमंत आहेत, पोक्त आहेत. घरांत ना सासू ना नणंद ना कोणाचा धाक ! तेथें एकदांची गेलीस आणि त्या श्रीमंतीच्या उपभोगांत पडलीस कीं, या तुझ्या गरीब जनकाला-मी खात्रीनें सांगतों-तूं विसरशील व तुला माझ्या म्हणण्याचा चांगला अनुभव येईल. तूं हल्लीं अनभिज्ञ आहेस. विवाहादि कार्याला जगाचा चांगलाच अनुभव लागत असतो. वेडी कोठली. म्हणे हा संबंध मोडा खुळी रे खुळी !!!

सुंदरी:—(स्वगत) इतकी विनवणी केली पण यांचं आपलं पहिलंच रडगाणं ! (उघड संतापानं) आग लावा त्या पैशाला नि त्या थेरड्याला. काय सुख होणार आहे तें माझं मला दिसतंच आहे—

चाल:-(माया जळली का.)

फुटले डोळे जरी। तो पाहील काय तरी ॥
पन्नास वर्षी म्हाताऱ्यांनीं । न वरावी पोरी ॥१॥

शंकरशास्त्री:-अगे पोरी, त्याला काय डोळे नाहींत कां नाक कान नाहीं का काय उणीव आहे ? तो तुला अगदीं गुलाबाच्या फुलाप्रमाणें जपील.

सुंदरी:-बाबा, धन्य आहे तुमची, तुमच्या बुद्धींत कांहीं तरी फरक पडला असावा खास. कारण-

डोकें फिरल्यावरी, ना देईल धन तरी ।
एका भिकाऱ्यासम तुम्हा दिलेंच बहुपरी ॥१॥

शंकरशास्त्रीः-शाबास, आम्ही भिकारीच बरें तूंतरी त्याच्या घरीं जाऊन श्रीमंतीण हो. कीं आम्हांला त्यांत आनंदच आहे.

सुंदरीः —

पद

पाया पडेल जरी, जाईल नर्की तोच तरी ॥
ईश्वराच्या पडेल पाया, जाईल स्वर्गावरी १ ॥

शंकरशास्त्रीः—हट्ट करूं नकोस. तुला माझें बोलणें मान्य केलेंच पाहिजे. ज्यास्त बोलायला फार उद्दाम झालीस कां ?

सुंदरीः—मी नाहीं कबूल करणार. जो दोन दिवसांचा सोबती आहे, ज्याचीं इंद्रियें गलित झालीं आहेत अशा त्या प्रेतवत खोडाशीं मी लग्न लावून माझें जन्माचें नुकसान करून घेऊ काय ?

शंकरशास्त्रीः - मी त्याच्याशीं तुझें लग्न लावणार ? लावणार ? लावणार ?

सुंदरीः — मी विहिरींत जीव देईन पण सहसा त्याच्याशीं लग्न लावणार नाहीं.

शंकरशास्त्रीः- (स्वगत) कारटीनें हट्ट तर खूब धरला आहे. आणि त्याप्रमाणेंच ती आपल्या जिवाचेंही काय बरें

वाईट करील त्याचाही नियम नाहीं. इच्या जिवाकडे पहावें तर सोळा हजारांवर पाणी पडूं म्हणते ? इकडे आड नि तिकडे विहीर. (सुचल्यासारखें करून) तिला आपण पितृहत्येचा धाक दाखवावा. नाहींतर चवदावें रत्न दाखवून जबरीनें द्यावा विवाह ठोकून नि काय? पण टाळी लागेपर्यंत मोठ्या कुशलतेनें कार्य उरकून घेतलें पाहिजे. (उघड) बरें, सुंदरे, मग कसें काय ? झाला कां विचार ? झाला नसल्यास मी बाजारांतून परत येईपर्यंत तुला मुदत दिली आहे (जातो)

सुंदरी:—बा पैशा, काय तुझा अगाध महिमा आहे ? असे तुझ्या मोहास वश होऊन मनुष्य वाटेल ते धाडसाचें अघोर–मलिन व भयंकर क्रूर कृत्यें करण्यास मागें पुढें पहात नाहीं अं. ! आतां मोठी कठिण वेळ आली आहे. एकतर विवाहास तयार झालें पाहिजे नाहींतर आत्महत्या करून जीव दिला पाहिजे. पण नको, कोण भयंकर हाल हे !

पद.

चाल:–(किती वानूं बल युवतीचें)

किती असे खरोखर दशा भयंकर कांहीं सुचे नाहीं ॥ हाल हाल हे होऊनि माझे, तनुही किती सुकली ॥
काय करावें जीवचि द्यावा ॥ (दोनवेळा)

खचितची निश्चय झाला माझा पडूं विहिरींत ही॥
॥ किती ॥ जग हे स्वार्थांनीं भरलेलें कोणी
न पाही आह्मां ॥
पहा ताता, कसें वदता ॥ (दोन वेळां)
खरोखरींच पैशासम नच दुसरा जगीं असे
वाली ॥ किती ॥ १ ॥

काय ह्मणे थेरड्याशीं लग्न लावीनच. केवढें आश्चर्य ! जणूं काय काक पक्ष्याचे गळ्यांत हिऱ्याची आंगठी बांधावी, किंवा एखाद्या दरिद्र्यास मौक्तिक कंठी अर्पण करावी, त्याचप्रमाणें हा बाबांचा विचार आहे. तर देवा!

पद.

चालः—(नृपाल कोप शांतवीण मी)

दयाळू देव कोप करूनि कां रे बैसला ॥ मति
फिरली तातांची, किती वदूं तुला ॥ दे तू मरण
येतें शरण, पदरीं घे मला ॥
देवा, आतां, कसें बघतां ॥
देईल थेरड्यास कीं, खचित तो मला ॥ दयाळू

शंकरशास्त्रीः—(बाजारांतून येऊन) कां सुंदरे झालेंना ठाम मत (पाहून) अरे हिचें आपलें एक सारखें रडणें अझून सुरूच आहे. ए अडादांड पोरी अझून कां रडत आहेस ? माझ्या बोलण्याकडे मुळींच लक्ष द्यावयाचें नाहीं काय ?

सुंदरी:— मरण येण्याकरितां रडत आहे.

शंकरशास्त्री: - ह्मणजे, मरण न आलें तर तूं आत्महत्या करून जीव देणार ? अरे वा ! मोठीच धाडशी आहे बुवा. बरें मी बघतों कशी लाडावत चालली ती.

सुंदरी:—हो हो, बाबा, अगदीं निःसंशय आत्महत्या करून घेऊन यमलोकाप्रत जाऊन त्या करुणाघन दयासागराला आह्मां सर्व अबलांतर्फे या भयंकर चाली मोडण्याविषयीं प्रार्थना करण्यास्तव मी निरोप घेऊन जाईन ह्मणजे तरी त्यास दया येऊन तुमच्या सारख्या जनकांना अशी कुबुद्धि देणार नाहीं. त्याचप्रमाणें तो परमेश्वर सरकारलाही इकडे लक्ष पोंचविण्याची आज्ञा करील व अशा भयंकर अपराध्यांना शिक्षा व्हावी एतदर्थ कांहीं कायदेही होतील. आणि असं झालं ह्मणजे हे ' कन्याविक्रय ' बंद होऊन अबलांच्या आशिर्वादाचें पुण्य घेण्यास मी समर्थ होईन.

शंकरशास्त्री:— काय मनोराज्य चाललें आहे पहा पोरीचें ? ह्मणे सरकार कायदे करतील. अग, सरकार काय कुठें आपल्या जातिरिवाजांत हात घालतें?

सुंदरी: — बाबा, मला आपण काय शिकवितां ? पूर्वी सति जाण्याची व बाल हत्येची किती क्रूर चाल होती ? कीं, विधवांची इच्छा नसतांनाही त्यांचे क्रूर

आईबाप पतीच्या शवाबरोबर त्यांना बळेंच जाळीत असत त्या चाली जर दयाळू इंग्रज सरकारानें मोडल्या आहेत, तर त्याहीपेक्षां भयंकर व जन्मभर होरपळत पडलेल्या विधवांचे दुःखाकडे सरकार लक्ष देऊन कांहींच तजवीज करणार नाहीं काय ?

शंकरशास्त्रीः — पुढच्या पुढें त्याचें. पण सध्यां काय? विचार ठरला ? मला असं कां दुःखांत ठेवितेस बाळे. (अश्रू ढाळितो)

सुंदरीः — बाबा, मी माझ्या नशिबाला दोष देऊन रडत होतें. पण तुमच्या हातांत तर हुंडा आला आहे. मग हंसण्याचें सोडून देऊन उगीच कां रडण्याचा आव आणितां ?

शंकरशास्त्रीः—माझें अखेरचें बोलणें ऐकून घे. माझ्या मनाप्रमाणें ह्या स्थळास पाठ देऊं नकोस; नाहीं तर हा पहा विषाचा पेला घेऊन मी जीव देतों. आणि मग माझ्यामागें तूं आपल्या मुकत्यारीनें मनास वाटेल तो नवरा पसंत कर.

सुंदरीः—देवा, तूं तर मला ह्या प्रसंगीं दुष्ट संकटांत घातलेंस. अरे मी विवाहास तयार न झालें, तर खरोखरच बाबा प्राण देतील व मग माझें जगांत हंसूं होईल. ' पितृभक्षक ' म्हणून लोक माझा तिटकारा करून पायाजवळही कोणी उभें करणार नाहीं व जिकडे ति-

कडे माझे अपकीर्तीचा डंका वाजणार! हायरे देवा, मला असे हाल पहावयास जिवंत तरी कां ठेविलंस—

पद.

चालः- (रडसि काय)

करूं मी काय हाय, अतां हे विश्वंभरा।
शोधुनि दावि मार्ग मला, तूं तरी खरा॥
लग्न करू कीं, मरण घेऊं सांग ईश्वरा।
सुचत नस ह्या मनांत विचार नच बरा॥

कांहीं हरकत नाहीं. आलला प्रसंग धीरनें लोटला पाहिजे. ह्या वेळेपुरता बाबांचे ह्मणण्यास रुकार दिलेला बरा. पुढें पहातां येईल.

शंकरशास्त्रीः—(हातांत विषाचा पेला घेऊन) कीं पिऊं आतां? (पिण्याकरितां तोंडाजवळ नेतो)

सुंदरीः-(हातांतील पेला हिसकावून फेंकून देऊन)

पद.

चालः-मारा तनमा मनमा.

हां हां घेऊं नका, ताता आतां, तुम्ही तरी व्यर्थ
देतां दोष भारी॥

मनास वाटेल तेंचि करावें, ह्या देहाची तय्यारी
॥ हां हां ॥
वाटेल तें मग होवो माझें तरी चिंता नका
भोगूं तात ॥
फेडावें मज कर्ज पूर्वींचे सर्वच-नको ठेवूं
कर्जारी ॥ हा हां ॥ १ ॥
(जाते)

शंकरशास्त्री:—हं आली ठिकाणावर. युक्ति पण कशी कीं गुरूची विद्या गुरूला फळास आली. थोडक्यांतच आटापलं. रुपये तर निःसंशय पचले. उद्यां लग्न करून दिलें कीं, झालें. आजकालच्या पोरींना वाटतं कीं आम्ही बाप ह्मणजे ताट्यावरच आहों. त्या म्हणतात म्हातारे नवरे मरतात पण समजत नाहींत कीं, तरूण काय मरत नाहींत? कितीक तरूण पतींच्या बायका विधवा झालेल्या दृष्टीस पडतात. जगणें वाचणें हें सर्व विधात्याच्या करणीवर अवलंबून आहे त्यास म्हातारा अगर तरुण कांहींच आडकाठी नाहीं. आणि म्हणूनच तरुणास मुलगी देणें काय, किंवा म्हाताऱ्यास मुलगी देणें काय, सारखेंच. आतां मात्र मजा झाली—

पद. (लावणी)

कशी झाली मजा, आली ठिकाणावर पोरी।
रुपये पचले आतां, त्याचा करूं सट्टा, कशी
सुंदर माझी सुंदरी ॥

सट्ट्याचा व्यापार, किती होई मजेदार, पैसे
मिळतील त्यांतचि भारी ॥
लोक म्हणतील मला, शेट सावकार भला,
सर्व करतील माझी ताबेदारी॥१

प्रवेश २ रा.

स्थळः–रस्ता

पात्रें —केशवराव

चालः—(घे घे मौज करून तूं आज)

कोण धरील गरीबची आश पैशाचा सर्व करी विश्वास । पैशावांचुनि कैक फिरती कोण विचारितो त्यास । पैसा आहे ज्यांच्याजवळीं बनती त्यांचे दास ॥ कोण ॥ पैसा जवळीं असे जयाच्या मृत विछानीं त्यास । म्हातारा वा ज्वान असो मग देती मुलगी खास ।. कोण ॥ पैशास पूजीती लहान थोर ते मूढ असो तरी त्यास ॥ विद्वान असो नच जवळीं पैसा खाईल धक्के खास ॥ कोण ॥

किती मजा आहे! पैशाच्या योगानें जी वस्तु पाहिजे ती तयार. श्रीमंतांनीं एक सोडून दहा जरी बायका केल्या, तरी त्यांना मिळतात नाहीं तर आम्ही गरीब लोक, दहा ठिकाणीं कां हिंडाना म्हणतात हुंडा किती देता? अगोदर हुंडा नंतर दुसरी गोष्ट परवां त्या शंकरशास्त्र्याच्या मुलीविषयीं गोष्ट काढिली. तेव्हां

उत्तर मिळालें. अगोदर सोळा हजार तयार ठेवा, नंतर लग्नाची गोष्ट काढा. आमच्या त्या सदाशिवरावानें खरोखरच सोळा हजार रोख दिले केवढी ही लग्नाची महत्वाकांक्षा ! काय हौस ! परंतु बेट्यानें त्या सुस्वरूप शिकलेल्या सवरलेल्या व गुणी मुलीच्या सुखाकडे थोडें तरी लक्ष दिलें काय ? ईश्वरा, काय हा अन्याय !

पद–सिंध भैरवी दादरा.

चालः–प्रभो अनाथ पालका.

प्रभो अनाथ बालकां, दया नसे त्या चालका ॥ धृ ॥
स्वप्रिय पाळुनि सुतां जिवाहूनि करी जतनता ।
स्व-तन झिझवूनि स्वतः वृद्ध वरास विकतां ॥ प्रभो ॥
न तात राहिला तया, सुतावरी नसे दया ।
वृद्धास देई कालिया, तुझ्याच हातिं सर्व कां ॥ प्रभो ॥
करीं जरीच तूं दया होई उद्धार मूलिया वालि नसे दूजा तया, घेई करा कन्यका ॥ प्रभो ॥

असो. आपण पडलों गरीब. आपल्यास त्या नसत्या भानगडी कशास हव्या ? सारांश, असे बाप मात्र फार कठोर मनाचे म्हटलें पाहिजे.

साकी

मूढ जनांचें मनोबल किती क्रूर असे ह्या जगतीं
हृदय तयांचें पाषाणासम दया चित्तीं नच वसती ॥
बाट हेच कसाई विकण्या सत्वर धाई ॥१॥

(जातो)

प्रवेश ३ रा

स्थळ–रस्ता.

पात्रें:–सुंदरी व शंकरशास्त्री.

सुंदरी:—देवा, आतां मी आपलें गाऱ्हाणें कोणाजवळ सांगू? बापानें तर उलटा आपला स्वतःचाच जीव द्यावयाची पाळी आणून उलट माझे कडूनच समजूत घालून मला विवाह करावयास स्वमुखानें तयार करविलें त्या म्हाताऱ्याशीं! अहो म्हातारा तरीपण किती! त्यास कांहीं मर्यादा आहे काय? निव्वळ अस्थिपंजर! अशा त्या स्मशानवत प्रेताशीं लग्न लावून मी आपलें जीवित कसें कंठू? व मला सुख तें काय मिळणार? त्या वेळेपुरती बाबांची समजूत घालून मी वेळ तर टाळिली, पण आतां पुढें कांहीं तरी उपाय कोणी मला सुचवील काय? देवा, ह्या वेळीं माझी आई असती तर खचित असा प्रसंग येतांना पण मी पडलें अभागी!

पद.

चाल—(चद्राकांत राजाची)

आई मला कां सोडोनि गेली लोटुनी या जगतीं ॥
मूर्तिमंत ह्या ताताच्या नच अधमाच्या हातीं ॥
लोटियली दुःखात दुहिता, काळाच्या हातीं ॥

लव न वाटे भीति जयाच्या, मनांतही अंतीं ॥
डोळे उघडोनि पाहीं मजवरी प्रिय मम
गे जननी ॥
तुझी सुता की दीनच झाली घेई लक्ष्या जवळी ॥
किती सांगू तरी मी हस्त जोडितें पदर पसरितें रे ॥
अंत नको तूं पाहूं आतां कन्या करीं घेरे ॥

शंकरशास्त्री:—कां सुंदरे, एकवेळ दृढ निश्चय करून तूच मघां सांगितलेंसना? तरी अद्याप तूं आपलें रडणें संपवितच नाहीं? त्या तुला काय म्हणावें?

सुंदरी:—बाबा, कांहीं नाहीं. उगीच राहून राहून पश्चाताप वाटतो झालें आपल्या मर्जीस वाटेल तसें करा. नंतर माझें मी पाहून घेईन.

शंकरशास्त्री:—एवढेंच ना! लग्न झाल्यानंतर व रुपये पटल्यानंतर? मग कोणास काळजी आहे. अग त्या श्रीमंत पतीच्या घरीं प्रवेश झाल्यावर तुझे हे सर्व कोते विचार आजिबात मावळून जातील. समजलीस? हं आतां उशीर लावूं नकोस गौरीहराजवळ लवकर येऊन बस कशी? (जातो.)

सुंदरी:—बरं आहे. लवकरच येत्यें आतां शोक तो किती करणार? व आढेवेढे किती घेणार? ती भयंकर वेळ अगदीं जवळ येत आहे, व प्रत्येक क्षण हल्लीं मला किती भयंकर वाटत आहे याची कल्पना कोणास

असणें शक्य असेल काय? पहा देवा, तं अखेरीस तो हृदयद्रावक प्रसंग माझेवर आणलासना?

पद.

चाल—(कधिं करिती)

पहा लोग, लग्न माझें त्या वृद्ध थेरड्याशीं ॥
कोणितरी, दुःख हें हरी, सोडवुनि वरी, विनति
करी, खचित तुम्हांशीं ॥ ह्या वृद्धा ॥
अझुनी-गम्मत पाहुनी स्वस्थता मनीं स्वस्थ
बैसुनी सांगु कोणाशीं ॥ या वृद्धा ॥

(जाते)

प्रवेश ४ था

स्थळः—सदाशिवरावांचें शयनगृह.

(छपरी पलंगावर गाद्या, गिर्द्या पडलेल्या आहेत.)

पात्रें:—सुंदरी व सदाशिराव.

(सुंदरी मंचकावरून लांब उभी राहते)

सदाशिवरावः—प्रिये. अशी उदास कां बरें ?

पद.

चाल—(याचा वदनशशि.)

तुझा वदन असा उदास कां दिसतो ॥
॥ असा हा ॥

काय तरी तुज होई मनाला, सांग मला परितो ॥
॥ असा हा ॥
दुःखहि वाटे मज हृदयाला जीव कसा बघतो ॥
॥ असा हा ॥
सुखासनीं बैसुनी सत्वरीं, काय मनाला तो ॥
॥ असा हा ॥

काय, अजून उभीच आहेस ? (जवळ जाऊन) प्रिये, तुझे पाय नाहींका दुखत ? किती वेळ अशी उभी राहणार ? ह्या मंचकावर बसून तुझ्या मनाला कोणतें दुःख आहे तें मला सांग, एका क्षणांत नाहींसें करण्याला हा तुझा दास तयार आहे. तरी लवकर काय तें समजूं दे. अगदीं हास्यमुख करून एक वेळ मजशीं बोल पाहूं ?

सुंदरीः—हसूं तरी कशी ? दांत दिसत नाहींत ?

सदाशिवरावः-हो समजलों, मला दांत नाहींत असेंचना तुझें म्हणणें ? अगे दांत नसले म्हणून काय झालें ? बाकी तर कांहीं कमतरता नाहींना ?

सुंदरीः-वाः आपण तसेच सर्व इंद्रियसंपन्न आहात ? मात्र तेवढे जिकडे तिकडे सफेती पसरलेली दिसत आहे.

सदाशिवरावः—त्यांत काय आहे ? हें बघ, उद्यां एक केश-कलपाची डबी मागवून केस कसे काळे

फुळफुळीत करून टाकितों. एकूण तुझ्या ह्या नाक मुरडण्यावरून समजावयाचें कीं, मो कांहीं तुला पसंत नाहीं. खरेंच कीं नाहीं ?

सुंदरीः—हें कांहीं स्पष्ट बोललेंच पाहिजे असं नाहीं.

सदाशिवरावः—असें काय बरें ? असें बोलून तूं आमचा हिरमोड मात्र करतेस अगं, तुला कांहीं कसली कमताइ आहे काय ? नानाप्रकारच्या रेशमी व जरीच्या साड्या, मोत्याचें कंठे, हिऱ्या पाचूंचे दागीने वगैरे सर्वकांहीं जें मागशील तें. (तिचे हनुवटीस हात लावून) ह्या तोंडांतून मुक्तफळें बाहेर पडण्याचा अवकाश कीं, तुझ्यापुढें असेंच समज.

सुंदरीः हो, सर्व कांहीं आहे. दागिने आहेत. अनेक तऱ्हेचे पोषाख आहेत. पण ते दाखवावयास योग्य असं माणूस मात्र नाहीं.

सदाशिवरावः—(आरशांत पाहून) योग्य, ह्मणजे आणखी कसा ! हे किती तरी पिळदार कमावलेलं शरीर, गोंडस व गोरी अंगकांति, हा भव्य चेहरा असें असून योग्य माणूस नाहीं असं तूं कसं ह्मणतस ? बरें पण एक वेळ हा गोड (चुंबन घ्यावयास जातो, ती त्यास झिडकारून दूर फेंकते) कां, फारच शेफारात चाललीस हो, सोळा हजार कांहीं फुकटाचे

नव्हते. बापास बरे गोड लागले भोजनांना ? आतां तुझ्या बापास बोलावून ह्या सर्व खोडी जिरवतों.

सुंदरीः — मला कोणाचीच परवा नाहीं पण मला बाई आश्चर्य वाटतं की, असले चाळे आपणांस म्हातारपणी कोणीं शिकवले ?

पद.

चाल — (सुने दिलदार)

म्हाताऱ्या अविचार हा तूं कां केला ॥
रुपये खर्चुनी व्यर्थचि कां, भ्रमुनी गेला ॥
रति-आशेला भुलुनी तूं लपविलें धर्म सुनीतिला॥
न शरम तुला ॥ १ ॥

अशा प्रकारें क्षणिक सुखाला भुलून व्यर्थ पैसे दवडिले. त्यापेक्षां पैशाचा सद्व्यय करण्यास इतर साधनें काय थोडीं आहेत ? अहो हेच सोळाहजार रुपये खर्चून एखादी धर्मशाळा बांधली असतीस तर कितीक लोकांची सोय झाली असती. एखादें प्रसिद्ध देवालय अगर विहीर बांधली असती अगर ती रकम योग्य कार्यात खर्चली असती तर अनेक दुःख पीडितांचे आशिर्वाद मिळून पुण्य लागलें असतें. तें सोडून देऊन ही दुष्ट वासना तुह्मास कोठून सुचली ?

सदाशिवरावः—(बाजूस) सोळा हजारांवर पाणी

पडणार वाटतें ! माझी छाती धडधडूं लागली आहे. आतां सामोपचारानेंच घेतलं पाहिजे (उघड) प्रिये, आतां बोलण्यांत काय फायदा? झालें तें झालं. ईश्वरी सूत्रापुढे कोणाचा इलाज आहे? हा आपला पूर्व जन्मीचा नेमानेम त्यांत तुझामाझा काय दोष? जरा शांत हो माझ्या ह्या अपार संपत्तीकडे एकवार नजर फेंक तरी हे तापनाशिने कांते क्रूर होऊं नकोस.

पद.

चाल —(लक्ष्मीसम चंचल)

मजवरिं क्रूर अशीं होशीं सुंदरी. ॥
हृदय उचल खाइ कसें वदुं किति तरी ॥
कठोरता तरी किति धरिशी ॥
अंत अता कां बघशी ॥
हात धरुनि चल कांते रेळूं मंचकी ॥ मजवरी ॥
कोपाला त्यजुनि देई ॥
गोडबोल तूं मजशीं ॥
रंग खेळुनि दंग होऊं प्राणेश्वरीं ॥ मजवरीं ॥ १ ॥

सुंदरीः - अहाहा. असले शब्द उच्चारण्यास व चाळे करावयाला कांहींही वाटत नाहीं. काय म्हणावें यांना.

पद.

चाल—(अंकित पदांबुजाची)

कांहिं धरा मनी तरी भीति धर्मनीतींत पडली
मती ॥ कांहीं ॥ लाजहि वाटे नच तुम्हांला

शब्द कसे रुचती ॥ कांहीं ॥ काय वदावें
वृद्ध पतीशीं ॥ बुडलें मी जन्मांति ॥ कांहीं ॥

(तिरस्कार युक्त पाहून आंत जाते)

सदाशिवरावः—काय करावें बुवा? मी तर समजूत घालून थकलों. अझून ही कांहीं ताळ्यावर येत नाहीं. म्हातारपणीं कांहीं तरी सुख मिळेल म्हणून सोळा हजार खर्चून हें रत्न आणिलें! तें पडलें असें विचित्र. पैसे व्यर्थ गेले. हाय हाय!! झारेकऱ्यासारखें खपून हें द्रव्य संचित केलें त्याचा कांहींच उपयोग झाला नाहीं. त्यापेक्षा लग्नच केलें नसतें तर बरें झालें असतें असें हल्लीं वाटूं लागलें आहे—

साकी.

हें जरी केलें लग्न परी मज वाटे कैसेच कैसें ॥
वधू मिळविली वृद्धपणीं ही देते सुखच ऐसें ॥
किंचित शरम नसे । बघतां काय वदतसे ॥१॥

हरहर! देवा काय हें माझे नशिबांत होतें? मला कोठून बुद्धी सुचली? अरे विश्वासघातक्या विष्णुशास्त्र्या तूं तिचें किती रूप-गुण वर्णन केलेंस? परंतु सर्वच विपरीत. आतां माझ्या हृदयांत प्रकाश पडला कीं हे खुषमस्करे आमच्यासारख्या उलुना कामापुरतें असेंच फसावितात! पण अत्तां काय त्याचें? माझी स्थिती

निवळ अमिष्टासारखी झाली आहे. पाय कांपतात अंगास कंप सुटतो. (पलंगावर जाऊन पडतो.)

सुंदरीः—(येऊन) मला वाटलें झोंप असेल हे उसासे काय ह्मणून ?

सदाशिरावः—(स्वगत) आतां ह्या संतापांत हिचेवर रागवून कांहीं उपयोग नाहीं. कारण ही भलतें सलतें बोलून आपला कोप मात्र जास्त होईल (उघड) प्रिये, माझे प्रकृतीस एकाएकी अस्वस्थता प्राप्त झाली आहे. तरी तेवढे त्या राम्या गड्याला बोलावून सांग कीं, डॉक्टरला पुढें घालून घेऊन येः—

सुंदरीः—राम्या अरे राम्या ?

राम्याः-(आंतूनच) काय मनताव बायसाब ?

सुंदरीः—अरे, आतांच्या आतां जा. आणि त्या डाक्टरांना लागलींच घेऊन ये. ह्मणावं यजमानांची प्रकृति फार घाबरण्या सारखी झाली आहे.

राम्याः—(आंतूनच) जी बायसाब जातो.

सदाशिवरावः-(बेशुद्ध स्थितींत बरळतो) कोण ते ? मला न्यावयास आले आहेत ? चालते व्हा मी नाहीं येणार आतांच कोठें लग्न झालं. अजून नवीन संसारांचा अनुभव मुळींच घेतला नाहीं. आणि आले

न्यायला. मी ही माझी प्रिया आणि हें अपार धन सोडून कधींही येणार नाहीं. (अंमळ शुद्धींत) प्रिये, तूं तरी यांना कांहीं सांग. हे पहा कसे माझ्यावर दांत ओंठ खाताहेत. बापरे, मला फार भीति वाटावयास लागली आहे. अरे यमदूत हो यमदूत!! थांबा. (थरथर कांपावयास लागतो. तितक्यात शास्त्रीबूवा येतात.)

शास्त्रिबुवाः—(येतात व नाडी पहात पहात) बाई, अंगांत विलक्षण ताप आहे. सन्निपात फारच वाढला आहे जेमतेम आजची रात्र कशी बशी निघेल ही मात्रा देतों, ती रात्रींतून दोन वेळ द्या. ईश्वरानें यश दिल्यास उत्तमच आहे. पण एकंदरीत कठिण दिसतें. (शास्त्रिबुवा जातात. सुंदरी रुदन करीत उभी राहते.)

सुंदरीः—आतां देवा! मला तर कसेंसेंच भयंकर वाटूं लागलं आहे. देवा हेंचना माझ्या कपाळीं लिहलं होतं?

सदाशिवरावः—हेऽ हेऽ हेऽ प्रिये, आतां अगदीं जवळ आला आहे. हा, हा, हा, हा, हाऽसूं नको. घे, घे, दागिनें साऽऽडी नेस. चिऽऽज्रा घाल. कां बोलत नाहींस? हे कमी आऽऽहेत जाऽऽतो. (उठतो, तरफडतो व प्राण सोडतो.) (त्याचे हात पाय पाहून)

सुंदरीः—हायरे देवा! नशीब फुटलें!! घात

झाला!!! सर्व शरीर अगदी थंडगार झालं माझं सर्व सुख सपलं. चांडाळा जनका, माझा गळा कापलान् मी आधीच नांवानें रडलें होतें. मला पूर्वीच भविष्य माहित होतें. पण आतां काय? अणखी काय विटंबना व्हावयाच्या असतील त्या होवोत. देवा, कसा रे ह्या अबलेवर घाला घातलास पण तुला तरी दोष काय ह्मणून देऊं ? माझ्या पूर्वजन्माच्या दुष्कृत्यांचीं सर्व फळें भोगणें राहिलेलीं ह्या जन्मांत कशीं चुकतील? राम्या बाबाला तरी लवकर बोलव. (रडूं लागते.)

पद.

चाल—सुने दिलदार.

सुखाशा कांहीं नच उरली ही जन्मीं या ॥
करूं मी काय न सुचे हाय लोकीं या ॥
सदाचित्तीं मनी वसती, कीं दैवी या ॥
विधिनें लिहिलें भाळीं, सिद्धाचि झालें मी
या काळीं ॥
जशी जी वेळ येई तींचि भोगाया ॥ १ ॥

[शंकर शास्त्री प्रवेश करून]

शंकरशास्त्रीः—काय सुंदरे, फार गडबडीनें बोलवणं केलंस ! असं काय महत्वाचें काम आहे ?

सुंदरीः—बाबा, घात झालन हो. पहाता काय

प्राण कुडींतून गेले. झालें जन्माचें मातेरें ! भयंकर अवदशा प्रप्त झाली. मला हें सर्व जगत् शून्यवत भासतं आहे. काय करूं ? बाबा, मी आपले नांवानें अगोदर किती बरे कंठशोष केला. पण आपण अखेरीस लोभाला बळी पडून माझा विवाह दिलाच उरकून. अहो, विवाह कसला ? तुह्मीं ह्या कन्येस सोळा हजार रुपये घेउन वैधव्य विकत घेऊन दिलें. असेंच ह्मटलें पाहिजे. बाबा, आतां कांहो मुकस्तंभ झालांत ? तो विषाचा पेला आपणचना तोंडाशीं लावून मजक-डून बळजबरीनें स्वकार घेतला. मला भ्रम होत चालला पाय थरारतात. सर्वांगास कंप सुटतो. माझी बोबडी बळते. ज्यास्त कांहीं बोलवत नाहीं. [बेशुद्ध पडते.]

शंकरशास्त्रीः–[त्यास पाहून] ऊठ, बाळे ऊठ. खरेंच मीच तुझा जन्माचा वैरी. केवळ लोभाला सोळा हजरांला बळी पडून तुझ्या जन्माची राख रांगोळी केली. त्या मला धिःकार असो ! आतां काय, हेंच पूर्वीं सुचलें असतें तर ? बाळे सावध हो. शांत हो. हा तुझा बाप नसून प्रत्यक्ष काळच आहे. यास वाटेल ते भयंकर शासन कर. तें भोगण्यास मी मोठ्या आनंदानें तयार आहे. विधात्याची मर्जी ! तो ठेवील तसें रहावें. असो शोक आवर, ऊठ.

[शंकरशास्त्री सुंदरीस सावध करण्याकरितां त्यांस घेऊन जातो; तोंच पडदा पडतो.]

प्रवेश ५ वा.

स्थळ-रस्ता.

पात्रेंः-सुंदरी मागाहून रंगराव फांकडे.

सुंदरीः-दैवाची गती किती विचित्र आहे. ज्या दिवशीं लग्न लागले, त्याच दिवशीं माझे आयुष्यांत उतरती कळा लागली व त्याचा परिणामही भयंकर स्थिती प्राप्त झाली हा होय. आतां जगांत मला कोणत्याही प्रकारचें सुख राहिलें नाहीं. ह्यानंतर ईश्वर भजनांत काळ घालवून आपले सद्वर्तन कायम ठेवावें. असा ईश्वराचा संकेत दिसतो. परंतु मनुष्य माझें माझें ह्मणून व्यर्थ माया पाशांत गुंतविण्यास प्रवृत होतात.

पद.

[रहि अले ही मेरी जाण]

हृदयीं धरा श्रीराम, सदोदित हृदयीं धरा
श्रीराम ॥ पूर्ण करी तव काम ॥ सदोदित ॥
कवडी कवडी मिळवूनी सारी केलें बहूत आवास ॥
अंतीं कोणाचे संग चाले व्यर्थ धरा कां आस ॥
॥ सदोदित ॥
रुष्ट पुष्ट ही काया असली नाहीं कुछ कामाची ॥
जीव गेलियावरी तिहीच होईल कवडी मोलाची ॥

॥ सदोदित ॥

मात तात सुत भगिनी भार्या वरी करी ममता
फार ॥ खोटी ममता अंती तुजला नरकीं की
नेणार ॥ सदोदित ॥
रामनामें आराम खरोखर वाटे मज हृदयांत ॥
अंती सुखी राखूनी सत्वर पोचवील स्वर्गात ॥१॥

रंगरावः-[येऊन] अहाहा, इतक्यांत गेली, ती कोण बरें असावी ? काय रूप तिचें तें मनोहर ! काय पाणिदार डोळे व सुदृढ कांती ? देवा मला तर तिचें वेडच लागून राहिलें आहे तीच नयनमनोहार मूर्ति नेहमी डोळ्यांसमोर असते. मला तर अगदीं तिच्या शिवाय करमेनासें झालें.

पद.

चालः—(पति केला बघुनि.)

काशि मिळेल मजला ही युवती ॥ न सूचे अन्य
ह्या जगतीं ॥ रूप किति तरी वानूं हिचें ॥ हृदयीं
निरंतर वास करी ।। दीपपतंगा ओढी कसा हा
तसेंच मन बघ हें ओढी ॥ १ ॥

(तिच्या मागोमाग जातो)

प्रवेश ६ वा.

स्थळः—देऊळ.

पात्रेंः-सुंदरी, रंगराव व इतर दर्शनास आलेली मंडळी.

सर्वजणः —

ईशस्तुती.

चालः-(पावना वामना.)

वंदना वंदना वंदना ॥ दे तव नित्य निरंजन
भंजना ॥ वंदना ॥
तुज नामे जळे पापाची राशी, होई मन्मन
रंजना ॥ दे तव ॥
हा राम सर्व नाम जनाला, आराम देई यामना॥
दे तव भजनीं ॥

[सर्वजण ईशस्तुति करून जातात]

सुंदरीः–[प्रवेश करून]

पद.

चालः–(दैवीं नया क य लिहिलेंस रामा)
दैवीं तरि काय लिहिलेंस रामा ॥ चिर सौख्य

सुकलें लघु या वयाला ॥ दैवीं ॥
वृद्ध वरासही नेऊनि सत्वर, बुडविलें जन्माला ॥
सौख्य हरूनि दुःख देऊनि, हरण केलें आरामा॥
॥ दैवीं ॥
तात मनाला रंजन केलें परि येई नच कामा ॥
दोष देऊनि मम कर्माला, गातें मुखीं तव नाम॥
॥ दैवीं ॥ १ ॥

रंगरावः-[प्रवेश करून]

पद.

चालः-(दियाको संदेशो मोरा कहियो जाय)

किती सुंदर रूप मला भुलवी, वाटे कीं चंद्र
आला ॥ किती० ॥
कसाहा शीतल, वदन मनोहर । पाहुनी वाटे
मनीं, आनंद हृदयीं, खरेंच झाला, वाटे कीं
चंद्र आला ॥ किती० ॥ १ ॥

मला सुंदरीचा मुखचंद्र केव्हां दिसेल बरें ! ती समोर कोण उभी आहे बरें ? हीच ती सुंदरी. आतां पूर्वी पेक्षां ही स्पष्ट दिसत असल्यामुळें तें मनोहर लावण्य किती तरी शोभायमान व मोहक दिसत आहे ते ! काय वर्णन करावें? विधात्यानें हिचे शरीराची रचना करतांना, मला वाटतें कीं आपले सर्व कौशल्य खर्च केलें होतें काय ? निःसंशय तसेंच असलें पाहिजे.

पद.

चालः —(तेथेंच उभि कां)

॥ हे वदन सुरेखशी कांति, किती रम्य दिसे
ह्या स्थळीं तीं ॥ ही उभी ॥
हे केश कुरळ कसे असती, नागिणीसम जरी
दिसती ॥ हीं उभी ॥
दोन्हीं नेत्र कसे चमकूनी, दाखवीं विजेसम
भीती ॥ ही उभी ॥
हीं अशीं, सांगूं कोणाशीं, स्मरण दिनंनिशीं
खरोखर देती ॥ नच निघे मनांतुनी हीती ॥
ही उभी ॥१॥

सुंदरीः–[रंगरावास पाहून] अरे, हा आपल्याकडे एकसारखी टक लावून पहाणारा कोण असावा बरें? एकदम अंगांतून अशा लहरी कशा उसळूं लागल्या कोण जाणे! व मनांत भलभलते विचार येऊन, एक-बार वाटतें कीं ह्यास कडकडून भेटावें.

पद.

चालः-[किती वानूं बल युवतींचें]

थरकांप तनूचा होऊनि, मस्तक कैसे मम फिरलें॥
चित्त कसा हा ह्या पुरुषांवर जाइं तें नकळे ॥

या समयीं, कुमतीही, मम हृदयीं, वास करी ॥
न सुच आतां मज कांहीं मन्मथ हेंचि कसे
विंधिलें ॥ थरकांप ॥ १ ॥ [जाते]

रंगराव फाकडेः-अरे, ती विद्युल्लते सारखी चमकून निसटली वाटते. हीच वेळ आहे हिच्या पाठोपाठ जाऊन अगर रेवतास पाठवून ती कोठें जाते ह्याचा तपास करावा. रेवतीच्या चांगली माहितींतलि आहे. तेव्हां आपण रेवतीचे पाय धरूं, व कसेंही करून भेट करीव अशी विनंती करूं. बरें विलंब नको. नाहींतर हांतची जाईल.

साकी.

भाग्यवान भूवरी मजसम नसेही कोणी दुसरा ॥
भेटेल जेव्हां युवति मजला तेव्हां त्या समयाला॥
हर्ष किती होई । सांगूं कसा कांहीं ॥

(जातो) ड्रॉपसीन.

प्रवेश ७ वा.

स्थळः—रेवतीचें घर.

पात्रेंः—रेवती व रंगराव फाकडे.

रेवतीः—आमचा धंदा स्पष्ट बोलायचं ह्मणजे कंटणपणाचा होय. जी स्त्री पुरुषाचे मनांत भरली

असेल किंवा एकादा पुरुष स्त्रीस पसंत असेल त्यांस तें मिळवून देणें हीं आमची कामें होत, आणि त्यावर मिळणाऱ्या पैशांतून पोट भरावं. किती उत्तम धंदा आहे ? हातास ना पायास मळ. फक्त स्त्री पुरुषांचीं मनें वळवून एकमेकांना परस्पराचे नादी लावणें ही आमची मुख्य कला होय. ह्या धंद्यांत पाप आहे, असें कित्येक ह्मणतात. पण मला तर बाई मोठंच आश्चर्य वाटतं कीं, स्त्री पुरुषांच्या मनकामना आह्मीं पूर्ण करितों, त्यांत पाप तें कसलें ? उलटें पुण्यच आहे लोकांनीं कोणास बरें ह्मटलं आहे ? असो. आमचे दोस्त रंगराव फांकडे अलाकडे बरेच दिवसांत आले नाहींत. फाकडे फारच चैनी गृहस्थ. नुसतं रस्त्यानें चालतां चालतां पांच दहा रुपये खर्च करण्यास मागं पुढं पहावयाचे नाहींत. स्वारींचं लक्ष नेहमी त्याच नादांत गुंतलेले असतं. अमुक गल्लींत अशी स्वरूपवान आहे, नखरेबाज आहे. [फाकड्याजी प्रवेश करितो] हं झालेच वाटतं. शंभर वर्षें आयुष्य आहे. कां अलीकडे बरेच दिवसांत भेटणं झालं नाहीं ? इतके दिवस स्वारी कोठें रमली होती ? निदान इकडे मधून मधून नुसतं डुकून तरी बघावयाचं असतं भेलं आह्मां बायकांचं मन कसं आपल्या चरणापाशी लागतं. पण तुह्मांस त्याबद्दल कोठें कांव आहे ? पण आज असा हा चेहरा उतरलेला कां ?

रंगराव फा०:—आपल्या सारखं जुनं माहितगार कूळ सोडून दुसरें आह्मी काय ह्मणून शोधूं ?

रेवती:—तें असो पण असं तोंड कां उतरलं ? लवकर सांगा मी ऐकण्याला फार अधीर झालं आहे.

रंगराव:-रेवती, काय सांगू ? तो वदनशशी पाहिल्यापासून मी भ्रमिष्ट बनलों आहे. कायतें रुप ? पुन्हां केव्हां पाहीन असं झालं आहे. खरोखरच रेवती, अपूर्व-फारच प्रेक्षणीय असें तें लावण्य पाहिल्यापासून मला अन्न गोड लागत नाहीं. कांहीं काम करणें सुचत नाहीं व रात्रंदिवस डोळ्यांनां झोप नाहीं. असें तें लावण्य-नव्हे ती स्वर्गांची अस्पसराच तूं मला आजच्या आज मिळवून दे. नाहीतर हे प्राण कांहीं आज रहात नाहींत.

रेवती:—अहो राव जरा शांतपणानं सांगा कीं असं तें मनाला चटक लावणारं रूप तुह्मीं कोठें पाहिलेत ? एकदांचा थोडासा जरी सुगावा लागला तरी मी त्याचा पूर्ण शोध करून आपल्या विरहास शांत करीन, पण थोडें कळूं तर द्या.

रंगराव फा०:—तूं हरप्रयत्नानं काम फत्ते करशील अशी खात्री आहे ह्मणूनच तुला तें सांगावयाचें. अग, ते सदाशिवराव-ते आज सुमारें महिना दीड महिला झाले स्वर्गवासी झाले. त्यांची अत्यंत लावण्यवती पत्नी तीच माझी हृदय हरण करणारी आहे. आतां तर स्पष्ट झालेंना. बोल, तुझें जन्म.चें दारिद्र नाहींसें करीन.

रेवती:—काय सदाशीवांची पत्नी ती सुदंरी ? मग

काय उशीर ! आज संध्याकाळीं तुम्ही भेटा. म्हणजे सर्व खुलासा समजेल.

रंगराव फांकड्या:—अगदीं बरोबर संध्याकाळीं येईन. नक्की ७ वाजतां येतो.

(जातो.)

प्रवेश ८ वा.

स्थळ:—सदाशिवरावांचें घर.

पात्रें:—सुंदरी, शंकरशास्त्री व रेवती.

सुंदरी:-त्या नटून सजलेल्या पुरुषाला त्या दिवशीं पाहिलानि; तेव्हा पासून बाई माझ्या मनाला एक प्रकारची तळमळ लागून राहिली आहे. खाणं, पिणं, कोणाशी बोलणं कांहीं सुद्धां गोड वाटत नाहीं. असें मला कां बरें वाटतें ?

पद.

पिलू.

देवा तुमचें काय मी केलें, दुःखावर डाग
कसे हे दिधले ॥ त्या पुरुषावर चित्त
कसें हें, होईल कैसें कांहिन कळतें॥ देवा ॥
जैसें जळवीण मीनास वाटे, तैसे वाटे
कधीं नोहि भेटे ॥ देवा ॥ प्रिय देहाची

होईल माती, चैन नसे त्या विण
एकांतीं ॥ देवा ॥ हस्त जोडितें,
पदर पसरितें॥ भेटीव मजला मम प्रियातें॥ देवा ॥

(शंकरशास्त्री प्रवेश करितो.)

शंकरशास्त्रीः—बाळे सुंदरी, कां रडतें आहेस ? वारंवार गत गोष्टींचा शोक करणं बरं नाही. बाळे. ईश्वराच्या मनांतून तुला दुःखाचे दिवस दाखवायाचे होते त्याच्या पुढें कोणाचें चालणार आहे? होणार तें झालें. ' कर्मणो गहनो गतिः ' दुसरें काय ?

सुंदरीः—बाबा, ईश्वराच्या मनांतून होते, असे ह्मणण्यापेक्षां माझा संकेत असा होता असें कां ह्मणत नाहीं ? तुह्मी मला एकदांच विकलें आहे. आता मजवर तुमचा मुळीच हक्क नाहीं. न जाणों पुनः हक्क लादून घेऊन दुसऱ्यास विकणार नाहीं ह्मणून कशावरून ?

शंकरशास्त्रीः—काय? माझा तुजवर आतां हक्क राहिला नाहीं? तर कोणाचा हक्क आहे? तुला लहानपणापासून खावयास प्यावयास घालून लहानाची मोठी केली. अन् माझा हक्क नाहीं ह्मणे! बोलतांना कांहीं शरम वाटावयास पाहिजे.

सुंदरीः बाबा, त्या खाण्यापिण्याच्या मोबदला तर तुह्मीं मला विकून सोळा हजार घेतलेत ! आतां

मजकडे तुमचं कांहीं ऋण राहिलं नाहीं कदाचित असल्यास तें मोल मजूरी करून फेडून टाकीन. आज पासून तुमचा व माझा संबंध तुटला. देवा, अशाप्रकारचे बाप नव्हत. असले धनलोभी बाप कोणासही देऊं नकोस—

पद.

चालः–(सज्ज करूनि चाप)

न मिळो कधिं तात अशी करिते प्रार्थना ॥
देवा नको अंध होउं, करूं नको जना ॥
क्रूर कसे हे वदतां । कसाया सम जरि भासती ॥
गरीब मुलींची हि गती । पायमाल ह्या जगतीं ॥
हा मनः स्वभाव ह्मणे, शापुनी तुला ॥ १ ॥

शंकरशास्त्रीः–अगे, ईश्वरास दया आली असती, तर तुझा पति गेला केव्हांच नसता. भवितव्यते पुढें इलाज नाहीं. करितां आतां श्रवण कर.

सुंदरीः–तुह्मीं एवढंच सांगण्यास आलां ना ? तें मी ऐकलें आत्तां स्वस्थ बसा. [स्वगत] काय बडबड लाविली आहे ? येऊन जाऊन याचे आपलं पूर्वी प्रमाणेंच आहे. [उघड] बाबा, आतां माझ्यानें मुळींच बोलवत नाहीं. माझें डोकें दुखत आहे. मी अंमळ विश्रांती घेते. [निजतें]

शंकरशास्त्री:-माझं बोलणं हिला रुचलं नसांवसं दिसतं [जातो]

रेवती:-(प्रवेश करून) गडे सुंदरी, अशी उदास व खिन्न होऊन कां बरं बसली आहेत? अग झाली गोष्ट पुन्हां कां परत येतें. पण खरंच बाई पूर्वीच्या व हल्लीच्या प्रकृतींत केवढा जमीन अस्मानाचा फरक पडला आहे? शरीर तर अगदींच कृश झालं आहे. मृतमाणसाबद्दल एवढा शोक करण्याचं कारण नाहीं. वेडी कोठली? हळू हळू विसर पाडला पाहिजे. अग तुझे हे तारुण्याचे दिवस असे कां दुःखांत घालवावयाचे? हें वय ह्मणजे सुखोपभोगांचे आदिस्थान. तेव्हां मी ह्मणते दुसरी कांहीं चिंता असली तर कळव. दूर करण्याजोगी असल्यास शक्य तितकी खटपट करीन!

सुंदरी:-विसर पाडावा ह्मटल्यानें कां पडत असतो! एकदम ही जखम कशी बरें भरून येईल? शिवाय त्याच चिंतेत दुसरें ही एक संकट उभं राहिलं आहे. तें तर बाई फारच गुप्त. मला सांगायला सुद्धां (लाजते)

रेवती:-अग, मैत्रींत लाज-लज्जा भीड मर्यादा कसली? मग ती का मैत्री ह्मणायची? मैत्रींत तर आपलें सुख दुःख एकमेकांस सांगणें व त्यांचा सल्ला घेणें हेंच तत्व आहे. ह्मणून ह्मणत्यें अगदीं सरळ मनांनं, भीड लाजसोडून खरं खरं तुझ्या मनांतलं मला सांग?

सुंदरीः—काय असणार, रेवती बाई,

पद.

चालः—(अरिवध करा धरा भार सारा)
जीव मम गेले तयावरिबाई, न ओळखी मी
तयापरी ॥ ही विनंती भेटिव प्रियाकरिं ॥
त्याविण जिवास, सदोदित मनास, जग कसें
उदास, भासतही ॥ दावुनि मज वदन मंदिरीं
तैसेंच गेलेच कीं ॥ येवुनि तूं तरी ॥ तयास
झडकरी, असूख वाटे क्षणोक्षणी ॥ बाई ॥ १

रेवतीः— तेंच काय? माझ्याही पण तें कारण लक्षांत आलंच. तुझें एकाद्या रंगेल तरुणानं मन हरण केलं आहे. पण असा तो कोण? ते तरी कळूं दे. कीं एका क्षणांत तुझी चिंता दूर करिते. तुमच्या सारख्यांची अशीच कृत्यें असणार. सुखोपभोगांचा खरा खरा काळ हेंच तारुण्य असतं. तेव्हां तूं तरी त्यास अपवाद कशी असणार ?

सुंदरीः—(स्वगत) देवा, ही तर मला माझ्या रोगावर वैद्यच भेटली आहे. बरें सांगतें.

रेवतीः—(बाजूस) काल आमच्या त्या रंगरावनी ह्या घरावरून जाण्याविषयीं सांगितलें होतें. पण अजून तो कां बरें आला नाहीं ? (समोर पाहून) आलाच

तो. (उघड) बरे सुंदरे, घरांत बसून बसून फार कंटाळीस. थोडें देवदर्शन वैगेरे घेऊन येऊं, तेव्हां चल जाऊं.

सुंदरी:—(दर्शनास जात असतां समोरून रंगराव मोठ्या डौलानें सुंदरीकडे पहात पहात जातो) हेच ते रेवती, माझं चित्त हरण करणारे ते हेच बघितलेस कां? तेच ते.

रेवती:—अग तोच काय? तो आमचा रंगराव फाकडे ते तर आमचें कूळच आहे. त्याबद्दल तूं यत्किंचित् काळजी करूं नकोस. मी त्यास कसेंही करून आज रात्रीं तुझे घरीं रात्रींने पाठविते मग तर झालं ना

सुंदरी:—आणखी तें काय पाहिजे? गडे, तूझे उपकार फारच आहेत.

[नातात.

प्रवेश ९ वा.

स्थळ-रस्ता.

पात्रें:-रेवती व रंगराव फांकडे.

रेवती:-अहो बघितलंत कां किती खटपट करून तिचं मन वळविलं चार पांच दिवस झाले, सारखें मागें लागलें आहे. तेव्हां कोठें एकदांचा रुकार मिळाला. बरें आज रात्रीं तुम्हीं तिच्या घरीं जावंत.

रंगराव:-शाबास ! काम तूंच फत्ते करावेंस. हें काम किती महत्वाचें व जबाबदारीचं पण तूं हां हां ह्मणतां पार पाडलंस. ज्याचें काम त्यानेंच करावं. आज मी कृतकृत्य झालों व ह्याचें सर्व श्रेय तुजकडेसच आहे.

रेवती:-बरें, रात्री सुमारें आठ वाजतां. ती आपली त्या माणिक चौकाचे वाड्यांत वाट पहात बसेल. ती वेळ मात्र चुकतां कामा नये. नाहींतर अशी संधी पुन्हां मिळणार नाहीं.

रंगराव:-अहो अशी अमूल्य संधी मी वाया जाऊं देईन काय ?

पद

चाल:-(लग्नाला जातो मी)

भेटाया जातो मी प्रिय सखी गृहा ॥
देतो निज प्रेम तिला आज हें पहा ॥
धन्य असें मी जगांत, नाजुक अंग मज अगांत,
मिळवील ती घरांत, चुंबन देई हास्य करीत ॥
न मिळे सुदिन असा पहाण्या नरा ॥ १ ॥

प्रवेश १० वा.

स्थळः-सुंदरीचें विलासगृह.

पात्रें: - सुंदरी व रंगराव फाकडे.

सुंदरी:—बाराचा सुमार होत आला, तरी अझून स्वारी कां बर आली नाहीं. मी तर कशी फारच आतूर झालें आहे. वाटतं कीं, केव्हां त्या कोमल मूर्तीचें दर्शन घेईन.

पद.

चाल:-(मनमोहना.)

प्रिया येईना, विरह सहन मज होइना ॥
जीव तुटे, न भेटे ही वाटे मना ॥ प्रिया ॥

साकी गुजराथी.

हें मन वेडें तूंजशीं, झालें कसें नकळें ॥
पाहिलें नच अझूनि मी, मन हें तुझें सगळें ॥
मज भासेना, सुख वाटेना ॥ प्रिया ॥

आतां किती वेळ मी धीर धरूं ? एकेक क्षण म्हणजे युगा सारखा भासत आहे.

पद.

चाल: — [ठुंबरी—बतादे सखी.]

मजवरी देवा करिशि असा कां कोप ॥

कारिशि असा कां कोप ॥ मजवरी ॥
वाट केंव्हांची, पहाते मी त्यांची, काय मी केलें
पाप ॥ मजवरी ॥

काय करूं ? सर्व अंगांची कशी लाही लाही होत आहे. (पडद्याकडे पाहून) कोणाचें बरें पाऊल वाजतं आहे ? आलेंस वाटतें. तेच प्राणेश्वर.

रंगराव:–देवा धन्य आहे मी.

पद.

सोरठ (वारी जाउं रे)

किती धन्य असें मी ह्या जगतीं, आनंद झालें॥
दिसे खरोखर प्रभू कृपा ती, झाली मजवर
फिदा जरी ती ॥ तैसे मजळा हीनें उल्लू
करूनि टाकियलें ॥ किती ॥ १ ॥

काय सांगू प्रिये ? धन्य आहे मी. बरें अगोहर ह्या सुखासनावर बस.

सुंदरी:–(स्वगत) आजकालचे पुरुष ह्मटले ह्मणजे निव्वळ उल्लू. घटकेंत कांहीं व घटकेंत कांहीं तरी विचार करीत असतात. तरी अगोदर अंतःकरण एकदम प्रगट न करितां जरा झिटकारल्याप्रमाणें करावें.

(उघड) आपण कोण ? कोठून आलांत ? एकदम ओळखपाळख नसतां दुसऱ्याचे घरांत शिरण्याचें काय कारण ? अशा एकांतांत परक्या स्त्रीबरोबर बोलायला तुह्मांला कांहीं वाटत नाहीं ?

फांकड्याः-(तिचे जवळ जाऊन) प्रिये.

सुंदरीः-ह्मणजे मी प्रिया ? कोणाची अरे दुष्टा, कांहीं तरी लाज वाटते काय ?

रंगराव फा०—आतां अशीं वरपंगी सोंग ढोंग दाखवून किती अंत पहावयाचा ? अग प्रिये सुंदरे, रेवती बरोबर निरोप पाठविणारी तूंच कां?

पद.

चालः—[धीमा धीमा चालोने मारा प्राणेर]

कसा दिसे वदन सुकुमार हा ॥
स्वर्गाची परी जणूं वाटे मशीं, दूर जाशी कशी,
विरह साहवेना ॥ कसा ॥ १ ॥

साकी.

अपराधी मी हा तुझा-दास उभा तयार ॥
क्षमा करूनि भेट दे-मदन छळिं अनिवार ॥
करूं विलास सखे कीं आतां सुखें ॥
उभी आहे केव्हांची न पाय दुखे ॥

मन रंजन करीं बोलुनि मुखें ॥
विनवितों तुला । विरह सहावेना ॥ कसा ॥ १

सुंदरीः — बस्स करा. हें सर्व तितक्या पुरतेंचना ?

पद.

कामदावृत्त.

गरज ही असे । तों वरीच ते । विनवि क्षणोक्षणीं ।
खरोखरीच ते ॥
गरज सरुनियां । काम जाहलें । पुसेन जन कधीं ।
जरि हस्त जोडिले ॥

ह्मणून ह्मणतें, गरजे पुरतें वाटेल तसें बोलून मग ढुंकून सुधां पाहणें नको. तुह्मां कपट्यांशीं स्नेह करावयाचा तेव्हां या पेक्षां

रंगराव फा०:—काय सांगू ? मी त्याप्रकारचा नाहीं. माझ्या पुढें तुझा वदनशशी नेहमीं प्रकाशित रहाणार आहे. मी कृतघ्नपणा कधींही करावयाचा नाहीं

सुंदरीः- हें खरं तरी मानवं कसं ?

रंगराव फा०: — प्रेमाची परीक्षा प्रसंगाखेरीज कळत नसते.

सुंदरीः-तें प्रसगांतीं दिसेल. पण अगोदर कांहीं

वचन विचन द्यावयाचं कीं, मी नेहमी खरेंपणानें वागेन कृतघ्नपणा केव्हांही करणार नाहीं.

रंगरावः–प्रिये, एवढेंचना. त्यास कितीसा वेळ. हें घे वचन, झालेंना!

सुंदरीः–आतां मला कांहींतरी आधार झाला आहे.

पद.

चालः–(तिळ तिळ तुटे म)

नच चैन मनी, क्षणभरही वाटतें कसें ॥
तुम्हां सम अन्य प्रिय जगिंही कुणि नसे ॥
जैशी जळवीन मीन दुःख करितसे ॥
तैसे मज होई प्रिया करूं आतां कसें ॥ १ ॥

रंगरावः- प्रिये असें मुळींच करूं नकोस. मी तुला क्षणभर देखील विसरणार नाहीं. बरं पण आतां थोडं जरूराचं काम आहे. तेव्हां अर्ध्या तासाची रजा दे.

सुंदरीः–माझ्यानें जा ह्मणून सांगवत नाहीं. तरी पण मी तुह्मांस थांबवीत नाहीं मात्र एवढंच सांगणं आहे कीं, या दासीस विसरूं नये.

पद.

चालः--[ही सुरासुधा ताशि]

नका विसरूं तुह्मीं तरी ओळख माझी ताजी ॥

काय सांगू मी जास्ती विनती करीं पदीं दासी ॥
अर्पिलें पदरीं तनमन सखया ॥ सोडूं नका
दावुनि प्रेम मला ॥ ही आस सगळी ॥ १ ॥

रंगरावः–खरोखर मी धन्य आहे. माझें पूर्व पुण्य फळास आलें. माझ्यासारखा सुखी त्रिभुवनांत कोणीही नाहीं.

पद.

चालः–(दिलदार यार छयलासें नयना)

पूर्वील पुण्य माझें उदयास आलें ॥
उदयास आलें, उदयास आलें ॥ पूर्वील ॥
या सुंदरीनीं प्रेम ओघानी ॥ न कळें कीं,
आज कसें, नेत्र गुंतलें ॥ पूर्वील ॥ १ ॥

बरें जातो आतां रजा मिळावी.

सुंदरीः–प्रिया, आतां मध्य रात्र टळून गेली आहे. आतां जाऊन काय काम होणार आहे ?

रंगरावः–ठीक आहे. अशा ह्या मनोहर रत्नास (तिचे हनुवटीस हात लावून चुंबन घेतो) कोण सोडून जाणार आहे ?

पद

चालः-(चालो साहेली)

जाउं उभयता २ रतिसुख भोगूं आनंदानें
ह्या समयीं ॥ बहु दिवसांचा, हेतु मनीचा,
पुरवूं उभयही ह्या जन्मी ॥
सुंदरीः— प्रेम अखंडीत ठेवावें निशिदिन।
वाहिलें। तनमन ह्या पायीं ॥ काम शरें
बहु पीडित झाले, शमवा प्रियकर धरीं
हृदयीं ॥ हास्य रसानें पूर्ण करा झणीं,
देऊनि चुंबनादिक मजशीं ॥ १ ॥

अंक दुसरा समाप्त.

अंक ३ रा.

प्रवेश १ ला.

स्थळः-पुण्यांतील व्यापाऱ्यांचीं दुकानें.

पात्रें:-वामनराव, सुंदरदास, शंकरशास्त्री वगैरे.

वामनरावः-कसें काय सुंदरदास, आज कांहीं फायदा वगैरे नाहीं झाला वाटतें. ह्मणुनच असे हिर-मुसल्यासारखे बसले आहां. सर्व लोक ह्मणत असतात कीं, सट्या सारखा व्यापार नाहीं. परंतु त्यांत जसा फायदा आहे, तसा तोटाही आहे ही गोष्ट त्यांना कुठें समजतें ?

सुंदरदासः-वामनराव, बसल्या बसल्या कांहीं धंदा करावा, असें मनांत आणिलें. तों कालच भडोचच्या मेच्या वायद्याचीं, चारशें गांठी, दोनशें अडत्तीसच्या भावांत खरेदी केल्या. आज घरून निघालों तों मंदी-वाले ह्मणतात कीं, आज २२५ चा भाव आला. माझ्या पोटांत तर धडकी भरली आहे बुवा. थोडा वेळ तारेची वाट पहातों. नाहींतर बाजार भावानं विकण्याची तार देऊं; नको, हा सट्याचा धंदा आपला बेतानें करावा हाच चांगला. दोन लाखांचा तो नफाही नको व दोन लाखांचा तोटाही नको. हजार पांचशे मिळवावे अथवा गमवावे. ते नवीन

दुकानदार अलीकडे दिसत नाहींव. (तार देणारा शिपाई येतो)

तार शिपाई:—येथें शंकर शास्त्री खडकीकर कोण आहेत.

वामनराव:—ते अझून आले नाहींत. कां ? त्यांची तार आहे वाटतं ? आमचीही आहे कां ?

शिपाई:—आपलें नांव काय ?

वामनराव:—वामन गणेश चिपळूणकर.

शिपाई:—आपली तार तर नाहीं. पण हे सुंदरदास भिकारीदास कोण ? त्यांची तार आहे.

सुंदरदास:-मीच तो सुंदरदास (तार शिपाई तार देऊन जातो) (तार वाचतो.) काय ? [Cotton very dull Broch 225) कपाशी फारच मंदी भडोच २२५ चा भाव आहे. केवढें आश्चर्य ? एका दिवसांत १३ टक्के घटले. झालें सव्वीशें रुपयांचे नुकसान. आतां करतो बदला (दुकानांत जाऊन उलट तार करतो) (शंकरशास्त्री येतो.)

शंकरशास्त्री:—कां सुंदररादास असे खिन्नवदन कां बसला ? कांहीं भावांत कमी जास्त आहे वाटतें ?

सुंदरदास:-या शेटजी कालच्या चारशें गाठींत

२६०० रुपये तोटा आला. ह्मणून उलट कपाशीं विकण्याची आर्डर तारेनेंच दिली आहे.

शंकरशास्त्रीः—मी सुद्धां काल मेच्याच वायद्याच्या बाराशें गांठी घेतल्या. पूर्वीच्या घेतलेल्या हजार गांठींत फारच नशीब जोरावर होतें. कालच्या गांठीं दोनशें चाळिसांत आहेत. आणि आतां भाव सव्वादोनशें ! अबब, प्रत्येक खंडी मागें १९ रु. याप्रमाणें तर नऊ हजार रुपयांचे नुकसान ? काय करूं ? देवानं आणखी एकादी मुलगी दिली असती, ह्मणजे टाकली असती कसर काढून. पण आतां काय त्याचें ?

वामनरावः—पण कांहो शेटजी बुवा, पावसाच्या सट्यावर किती रुपये लावतां?

शंकर शेटः—दोन हजार. जर पाऊस न पडला तर तुमच्या जवळून दोन हजार रुपये घ्यावे व पाऊस पडला तर दोन हजार रुपये द्यावे.

वामनरावः—ठीक, कबूल. करा लेखी करार.

(शंकरशास्त्री लिहून देतों. व रुपये दोनशें घेतो.)

लेख.

वामन गणेश चिपळूणकर यांसी लिहून देणार शंकरशास्त्री खडकीकर, आज मिति भाद्रपद वद्य अष्टमीस

पाऊस पडला तर मी तुह्मांस दोन हजार रुपये रोख इंग्रजी शिक्याचे मोजून देईन. व जर न पडला, तर तुमच्या जवळून रुपये दोन हजार घेईन व तुमच्या जवळून आज रोजीं रुपये दोनशें अॅढव्हान्स ह्मणून घेतले आहेत. हा लेख मी माझें राजीखुषीनें व अक्कल हुशारीनें कांहीं एक अंमलपाणी न करितां लिहून दिला आहे. मिती मजकूर. सही शंकरशास्त्री.

सुंदरदासः–(स्वगत) बेट्यानें कधीं दुकानदारी केली तरी होती ? भिक्षा मागून पोट भरून व आपली मुलगी विकून पैसे जमविण्यांत ह्यांचा सारा जन्म गेलेला व त्या रुपयांवर दुकानदारी घातली. तें पुरें तरी कसे पडेल ? वादळाचा रंग तर दिसत आहे, आज खात्रीनें पाऊस पडलाच पाहिजे. असो पापानें मिळविलेल्या धनाचा असाच शेवट होणार! [वरपाहून स्वगत]

शंकरशास्त्रीः–अरेरे आपण करार केला काय इकडे तर पावसाचीं चिन्हें दिसत आहेत. त्या पहा विजा चमकूं लागल्या आहेत. मेघांचा गडगडाट होऊन, आतां पाऊस पडणार असें वाटतें. [अंधकार होऊन विजांचा कडकडाट व मेघांचा गडगडाट सुरू होऊन पाऊस पडतो.) देवा, फार वाईट गोष्ट केलीस आतां दोन हजार रुपये द्यायला कोठले आणूं ? तो वामन्या तर आतां धांवतच येईल. चला आतां त्यास गुंगारा देऊन पळून जावें लांब कोठें तरी. [जातो]

प्रवेश २ रा.

स्थळ-रस्ता.

पात्रें:—शंकरशास्त्री.

शंकरशास्त्री:— हरहर देवा ! मुलीस विकून आलेले सोळा हजार रुपये या सट्टयाच्या व्यापाराखालीं निकाल झाले ? शाबास बुवा मारवाडी गुजराथ्यांची. त्यांना हे व्यापार कसे उत्तम मानवतात कोण जाणे ! आपलें तर बुवा सर्वस्वी नुकसान झालें. घरांत खावयास सुद्धां नाहीं. आणखी एकादी मुलगी देवानें दिली असती तर किती उत्तम झालें असतें ? पण आमच्या नशिबांत पैसा नसेल त्यास ईश्वर तरी काय करणार ! मात्र हा व्यापार सहसा करूं नये.

पद.

चालः-(हा नको नको संसार)

हा नको नको सट्टा, लावि बट्टा ॥
दैवानं फिरविली काडी तेव्हां हा मज आला तोटा॥
प्राक्तनीं धरुनि विश्वासा ॥ गमाविला जवळचा पैसा ॥ सट्यांत आलीं नुकसानी ॥ कर्जारी झालों ह्या काळीं ॥ सट्यानं लावुनी रट्टा बसविलें देऊनि हा लोटा । १ ॥ मोठे ही कैक

सख्यानें ॥ गमविली अब्रू तोख्यानें ॥ कैकही मेले विषानं कैकही काढि दिवाळें ॥ बुडविलें सर्वांसही ह्यानें दावुनि नफ्याचा तोटा ॥ २ ॥ करी विनती जोडुनि हस्ता ॥ हा दास तुह्मां तो परता ॥ सोडा नाद जरी सख्याचा ॥ नच लाभ असे कवडीचा ॥ कां आश ठवितां यांत मिळे नच तिळभरही पोटा॥ ३॥

ह्या सट्ट्याच्याच प्रभावानें आज ही दशा प्राप्त झाली आहे व भिक्षेची पाळी आली आहे.

साकी

पूर्व जन्मिचें पाप पुण्य ही लाभ देती ह्या जन्मीं॥
शुभ अशुभ फळ मिळे तत्पर हें लिहिलें जें कर्मीं॥
सत्य अशा विधिनें ॥ न टळे कधीं कोणानें ॥१॥

प्रवेश ३ रा.

स्थळः—सदाशिवरावांचें घर.

पात्रेंः - सुंदरी व रंगराव फाकडे.

सुंदरीः—आतां बाई मला कशी भयंकर भीती पडली आहे. जगांत मानखंडना व हसूं होण्याची वेळ आली आहे. ह्यास काय उपाय करावा. मला बोलायाची सुद्धां लाज वाटतें. आज मला पूर्ण चार महिने लोटले. तेव्हां लवकरच याची कांहीं तरी व्यवस्था केली पाहिजे.

सांगून सांगून दमलें. परंतु तिकडून कांहींच खटपट होत नाहीं. कशी तरी उडवा उडवीचीं उत्तरं मिळतात.

[खिन्न होऊन बसते)

रंगरावः-(तीस पाहून) प्रिये आज अशी उदासीन कां बरें दिसतेस ?

पद.

चालः-(मी असोनि नृपकांता)

मुख म्लान कसें दिसतें । झडकरी वद सरितें ॥
किती विनवूं सखे तूं तें । स्पष्टचि वद मजतें ॥
सुंदरीः- खचित कसे हे नर । बोलुनि वरवर । फस-
विती बोली शर । मधुर कसे ॥ अति ॥
रंगरावः— शंकाही मजशीं । व्यर्थचि कां घेशीं ॥
सुंदरीः—फसविलें प्रेम-पाशीं । पाडिलें कीं पुरी फशीं॥
हंसतील सर्व मशीं । लोक पहा ॥ कसे ॥१॥

मी तर सांगून सांगून दमलें. अहो जर कां हें कृत्य हां हां ह्मणतां उघडकीस आलं, तर तुमचे नि माझे कोणी हाल खाणार नाहींत. सरकार दरबार करावे लागून बिनभाड्याचे खोलींत मात्र जाण्याचा प्रसंग येईल. ह्मणून ह्मणत्यें लवकरच सावध व्हा.

रंगरावः—अग तें .. आणायला कितीसा अवकाश ?

पण गांवांत तर आपल्या विषयीं भलतीच कंडी पिकली आहे.

सुंदरीः—ती कोणती ? हीच कीं काय ?

रंगरावः—नव्हे ही नाहीं. ती अशी कीं, तुझा बाप येऊन तुझें सर्व इष्टेटीचा पंचनामा करून तो आपलें कब्ज्यांत ठेवणारा आहे. तसें झालें तर तुझी नि माझी चैन कशी चालणार ? व आपलें पुढें कसें होणार ?

सुंदरीः-बरं झालं ही बातमी आपणांस अगोदर समजली तो बाप येण्याच्या अगोदरच अस्सल माल लांबिवला ह्मणजे झालें कीं नाहीं ? मग काय बाकी राहिलं तें दिसतंच आहे. ह्मणून ह्मणत्यें जें आहे नाहीं तें सर्व घेऊन आपण दूर कोठें तरी पळून जाऊं. आहे का तुमची समंती ह्याला?

रंगरावः—आहे, युक्ति तर फार नामी आहे. पण आपण पुढें कोणाच्या हातीं लागलों, तर काय उपाय करणार ? मग तर फार भयंकर प्रसंग ?

सुंदरीः-असं नामर्दपणाचं भाषण करण्याला कांहीं शरम वाटत नाहीं ? हातांत आमच्या सारख्या बांगड्या तर भरल्या नाहींत ना ! चांगले अब्रूदार दाढी मिशी-वाले धनी, नि गोष्टी भागूबाईसारख्या. धिःकार असो तुमच्या त्या वाणीला! पण, पूर्वी दिलेल्या वचनाची स्मृति मात्र असूं द्याः—

पद

चालः—गायन करूनी

दिधलें वचना याद करा, प्रिय सखया, तुह्मीं
तरी ध्यानीं या ॥ जाउ नका निशिदिनीं या,
रति सुख मम गृही भोगाया ॥ भीती अशी
हृदयीं तुह्मीं ॥ कां ठेवितां हो समयीं या ॥
तन मन हें धन हें तसें अर्पियलें तव चरणीं
जन्मी या ॥ १ ॥

रंगरावः-(स्वगत) अरे, हें लचांड तर पक्कें पाठीस लागलें. मला वाटलें ताकापुरतें रामायण करून आपलें काम साधून घेऊं. पण ही वस्ताद! परंतु कसेंही करून येथून निसटून जावें. नाहींतर जिकडे तिकडे अपमान होऊन सरकारकडून भयंकर शासनही होण्याचा संभव आहे. (उघड) वा प्रिये, मी ती मागील गोष्ट विसरेन असें कधींहीं होणार नाहीं. बरें, सध्यां तूं शांत ऐस सायंकाळीं मी सर्व व्यवस्था करून ठेवतों.

सुंदरीः—बरं पण, अगदीं लवकर, हजार काम सोडून येणं होईल कां?

पद.

चालः—[धीर धरीरे मना तूं]

त्वरित जाऊंनी प्रिया हो, त्वरित जाऊनि। बघतें

वाट परतावें, त्वरित जाऊनि ॥ देऊं नका अंतर या, दीन दासीला ॥ विनवितसे प्रिया याहो, त्वरित जाऊनी ॥ १ ॥

कां, गेलेच वाटतें माझा डोळा चुकवून! बरं पण, हा मला आज अपशकून कां बरं होत आहे. कांहीं तरी विपरित प्रकार खास दिसतो.

कामदा.

येई मजकसा ॥ प्रसंगही असा ॥ कळे न किमिपि तो ॥ कीं प्राण घातका ॥ दुःख होतसे, स्वरंच ह्यामुळें ॥ क्षणोक्षणीं पहा, अझूनि हा लवे ॥ १ ॥

[समोरून केशवराव प्रवेश करितो]

कोण बरें, केशवराव? अहो कोणीकडे येणं केलंत!

केशवः-सुंदरा बाई, काय करूं? ईश्वरा नेमानेम नव्हता. मी आपल्या बापाजवळ तुमची मागणी केली. तेव्हां तो ह्मणाला, मी सोळाहजार रुपयांला ती सदाशिव रावानां दिली आहे. त्यापेक्षां जास्त देत असल्यास बोला; परंतु मी माझ्या कम नशिबाने निर्धन असल्यामुळें गुप चीप बसावें लागलें. असो, झाली गोष्ट पार पडली. आपला पती मरण पावला. ही गोष्ट फारच वाईट झाली आहे. पण त्याहूनही भयंकर अशा कंड्या रोज

नवीन नवीन पसरत असतात कोणी ह्मणतो, ती सुंदरी बिघडून गेली. कोणी ह्मणतो तिनें चार महिन्यांचं ..... ! काय बोलूं ? बोलतांना शरम वाटते. नाना प्रकारच्या अनर्थकारक व भयंकर अशा गप्पा लोक पसरवीत आहेत. त्यामुळें ती गोष्ट अपमानकारक आहे. ह्मणून ह्मणतो कीं, तुमचं सगळं द्रव्य वगैरे मालमत्ता बापाचे स्वाधीन, करून त्याचे जवळ स्वस्थ अंतःकरणानें रहावें, यावर आपली मर्जी ?

सुंदरीः-काय ? केशवराव तुह्मीही त्या कन्याविक्रय करणाऱ्या माझ्या बापास त्या कृत्यांत साह्यच करतां, असं ह्मटलं पाहिजे. कारण त्या शिवाय तुमचे डोक्यांतून असले विचार बाहेर आलेच नसते.

केशवः-अहो सुंदरी बाई, तसं तुह्मी मुळींच समजूं नका. अहो, तुह्मी बापाजवळ असला, ह्मणजे तो हर प्रयत्नाने तुमचे अब्रूचा बचाव करील. मला काय, कोणताही पक्ष धरावयाचा नाहीं. पण तुह्मांला हा एक मार्ग सांगितला आहे. पसंत वाटल्यास तो पत करा नापसंत वाटल्यास सोडून द्या.

सुंदरीः-अहो, समजलें तुमचा हेतू. आपण तरी त्यांचेच सोबती दिसतां, वरून मोठा हित करण्याचा भाव आणिला आहे. पण आपलं अंतःकरण आंतून काळेकुळकुळीत आहे. ही सुंदरी पक्कें जाणून आहे. समजलांत !

केशवः-हो हो. समजलों. जोंपर्यंत स्पष्ट बोलत नाहीं, तोंपर्यंतच बडबड चालली आहे. ज्याला कांहीं अंतःस्थ वर्म माहित नसतील, त्याला शिकवा असल्या गोष्टी.

सुंदरीः-काय, आपल्याला माझीं वर्मं माहित आहेत? तें समजूं तरी द्या एकदांचें !

केशवः-अग, ज्यास्त काय बोलतेस ! तुला बोलायला तोंड कोठें आहे ? रोज रात्रीं तो येथें तुजकडे कोण येत असतो ? तो फांकड्याजीच ना ? व त्या सोबत पळून जाण्याचाही विचार केला आहे ना ? आणि हें चार महिन्यांच...... कोणाचं कृत्य ! बोल. आतां कां बरें चेहेरा उतरला ? तुझीं कृष्णकारस्थानं सर्व जगाला माहित पडलीं आहेत. तुला वाटतं जसं कांहीं आपण करितों तें गुप्तच राहील. पण पाप आड्यावर बोंबलतं, हें कुठें तुला ठाऊक आहे ? हा पूर्वीचा नुसता केशव नसून 'डिटेक्टीव्ह केशव' हें नामाभिधान बाळगणारा सरकारचा पक्का गुलाम आहे समजलीस. आतां तरी लवकर काय व्यवस्था करावयाची ती कर. व सावध रहा. (जातो)

सुंदरीः-काय माझं हें गौंडबंगाल सर्वतोमुखीं झालं ! मग तर बाई प्राणच दिला पाहिजे हो. त्यापेक्षां हें कृष्णवदन यापुढें मी कोणासही न दाखविण्याचा विचार केला आहे. आज संध्याकाळ पर्यंत त्या रंगरवाची

नव्हे, त्या घातक्याची वाट पहाते. त्यानें कांहींच तरतूद न केली, तर खुशाल जगाला अखेरचा रामराम ठोकितें.

पद.

चाल–(अरे मुजे छोड)

अशी कशी आलि वेळ । मज न कांहीं सूचतीं ॥
जन हें वदती कृष्णमुखीं । छिः थूः करूनि
हसतीं मुखीं ॥ वाटतेंच ह्या पुढें कीं । प्राण
द्यावें सोडोनी ॥ १ ॥ (जाते.)

प्रवेश ४ था.

स्थळ–रस्ता.

पात्रें:—रंगराव.

रंगराव:–आतां सुंदरीजवळ राहण्यांत कांहींच फायदा नाहीं. स्त्री मोहाच्या वेड्या पाशांत सांपडून हें भलतेंच कृत्य झालें व त्याची संपादणूक कशी करावी? मलातर बिलकूल सुचत नाहीं. आतां येथें राहिल्यास आपली धडगत नाहीं. ह्मणून हें गांव सोडून लांब कोठेंतरी देशत्याग करावा. नाहीं पेक्षां त्या यमाहूनही भयंकर काळे डगल्यावाल्याचे स्वाधीन होऊन बिनभाड्याचे खोलीचा रस्ता धरावा लागेल. त्यावांचून गत्यंतर

नाहीं. त्यापेक्षां सोपें असें 'यः पलायते' करावें यावांचून दुसरें सोपें साधन नाहीं. बरं, पण सुंदरीस बरोबर न्यावी काय? पण नको. तें तर ज्यास्तीच लचांड व्हायचं. काल रात्रीं तिजोरीवर चांगलाच हात मारला आहे. पैशाअडक्याची काळजी तर नाहीं. मग सुंदरीस बरोबर घेण्याचें काय कारण उरलें? एकादें पत्र द्यावं पाठवून, नि व्हावें चालतं.

पद.

चालः—बंजारा.

मज वाटे सोडुनी तीला। जावेंच कीं परदेशाला धिःकार असो मुर्खांना। जे विकीती प्रिय तनयांना॥ त्यामुळें समय हा आला। व्यर्थची अशा समयाला॥ चाल॥ सुंदरीचें प्रेम मजवरती॥ येण्याला मज संगातीं॥ पण पापफुटें ह्या जगतीं॥ मग शिपाई आह्मां धरिती॥ त्याहुनी। हिला एकटी। जावें त्यजुनी। परदेशाला। हे बरेंच वाटे मनाला॥ मज वाटे॥१॥

प्रवेश ५ वा.

स्थळः—रस्ता.

पात्रेंः—रेवती.

रेवतीः—(भिकाऱ्याच्या वेषानें येते) काय करूं

मी आज तीन दिवस झालें उपाशी आहे ! कोणी मूठ-भर दाणे किंवा भाकरीचा तुकडा सुद्धां देत नाहीं. सारेगांव फिरून फिरून थकल्यें. आतां पायाची कशी आग होऊन राहिली आहे. माझें पाप मला आडवें आलें, धरलेल्या नीच कुंटणीचे धंद्यांत पहिल्यानें फारच लाभ दिसला, परंतु घरांतलें सर्व गेलें व ह्या अवस्थेंत आलें. काय करूं पोट अगदीं पाठिशीं लागलें. उभें राहूं ह्मणतें तर उभे राहवत नाहीं, परमेश्वरा कशाला असा नीच धंदा दाखविला, ह्या धंद्यांत कांहींच लाभ नसून फारच हानी आहे माझे हाल पहा कोणी ढुंकून पाहणार नाहीं. त्या रंगरावचा मी फारच तपास केला, पण असें ऐकिलें कीं, तो पळून गेला. आतां कोणीच वाली नाहीं. ईश्वराला सुद्धां दया येणार नाहीं ह्या धंद्यापासून झालेले हाल पहा, बायांनो, सोडा असा नीच धंदा.दुसऱ्यांची बायका पोरें फसवून पापाचे घडे भरून,अशा नीच अवस्थेंत येण्याचें धाडस करूं नका,जळो हें पोट ! भुकेनें जीव कसा कासावीस होऊन देहांतून प्राण जातो असेंच वाटतें. कोणी खाण्यास तरी द्या. (कोणीच देत नाहीं.) पण कशाला हवा, असेंच दुःखानें व हाल हाल होऊन मेले पाहिजे. अग आ ....ई.......मे....... ले. चक्कर ये...... तें. (चक्कर येऊन खाली पडतें.) पा....... णी ....पा णी...... हे........द........या ....घ .... ना द ...... या........क ....र.(पुढें बोलवत नाहीं व बेशुद्ध पडतें) [पडदा पडतो.]

प्रवेश ६ वा.

स्थळः-सदाशिवरावांचे घर.

पात्रें:-सुंदरी, शंकरशास्त्री, एक मुलगा.

सुंदरीः-

पद

चालः-(मिरवीत गौरी, चला ग नेऊं)

जगतीं, कपटीं किती नर वसती ॥ पहाहे
कपटीं ॥ तन-मन-धन हें अर्पण केलें ॥ सोडुनि
मज दुःखांती ॥ पहाहो ॥ निंद्य कृतीचीं जग
नायक त्या । देईल खास शिक्षाच तीं ॥
हो कपटीं ॥ नेहमी सांगणें असेंच त्यांचें ॥
न सोडी मी जन्मांति ॥ पहाहो ॥ १ ॥

खरोखर, मनुष्यांची जातच कपटी.

पद.

(तानसेन होरी.]

किती निर्दय ती नर जाती ॥ केवळ वशती
कामा पुरती ॥ किती ॥ मधुर शब्दानें, वर
कांतीनें, फसविती दिन किती युवती ॥ केवळ ॥

मनिंनच प्रीती, कपट ठेविती ॥ हृदयांत पापांची
भरती ॥ केवळ ॥ १ ॥

(पत्र पाहून) अरे विश्वासघातक्या पाषाण हृदया नीचा, तूं कधींही सुखी होणार नाहींस. अरे कपट्या तुझी इतकी विनवणी केली, दयेनें मी तुझ्याकडे केवळ गाय बनलें. पण तुला एकट्याला जातांना कांहींच वाटलें नाहीं काय ? (पत्र वाचते) ' मला क्षमा कर ' आतां क्षमा ती काय करणार ? मी क्षमाच केली आहे. पण तो ईश्वर सर्वसाक्षी तुला तुझ्या दुःष्कृत्यांचें योग्य असेंच शासन करील. ' लोकलज्जेस्तव निघून जात आहे. ' अरे अविचाऱ्या, तुला हें जर समजत होतें तर असा आडमार्ग आरंभींच कसा स्वीकारिलास ? मेला, नेहमी ह्मणत असे माझें तन-मन धन सर्व तुझें ठायीं आहेत, मला भोळीला हा तुझा दुष्ट कावा कसा कळणार ? कांहीं हरकत नाहीं. तुझे मजवर उपकारच आहेत ह्मणावयाचें ? आतां मी त्या दीनवत्सल दयासागराजवळ अक्षयींची विश्रांति घेणार. [विषाची पुडी काढून] या सर्व भक्षक विषा तूं लोकांना किती भयंकर वाटतोस ? पण ह्यासमयीं मला किती प्रिय झाला आहेस अखेरचा माझा साथीदार तूंच, तूंच माझा जिवलग मित्र, आतां मला त्या परमेश्वराजवळ पोंचविण्याचं साह्य कर. हे घातक्या द्रव्या ! काय तुझा विलक्षण महिमा आहे ? तुझ्या पायींच मला ही भयंकर स्थिती प्राप्त झाली ना ! अहो भारतवासी जनहो, तुह्मीं माझा

तिरस्कार करूं नका. मला नांवेंही पण ठेवूं नका. पण ह्या माझ्या उदाहरणावरून आपण कोणता धडा घ्याल? तर तो हाच कीं, तुह्मीं आपल्या निरपराधी भगिनी व कन्या यांचा, लोभाला बळी पडून विक्रय करूं नका. एवढेंच हात जोडून तीन तीन वेळां अखेरचें सांगणें आहे, व त्याकडे तुह्मीं दुर्लक्ष करूंच नका. (उभी राहून) आणि माझे भगिनींनो, तुह्मांही आपल्या पोटचा गोळा-नऊ महिने वाढविलेला, द्रव्य लोभास्तव विकूं नका; असें अनितीचें द्रव्य मिळाल्यानें मनुष्य स्वर्गास तरून जात नाही. हातापायांत दागिने नसल्यानें तीं रुसून बसत नाहींत. मग तुमचा तरी एवढा स्वार्थपणा काय ह्मणून? ज्यास्त कांहीं बोलत नाहीं. ह्यांतील सारांश लक्षांत आणा, देवा:-

पद.

चाल:-[हे हे मन तूं सावधरे]

दे-वा तूं करिरे क्षमा मला ॥ कामशरें बहू
पिडवुनि । भुलवुनि । दाखविलें सुख पदोपदीं॥
अं- तीं-कीं विष हा होई भला ॥ देवा ॥ १ ॥
क्षमा करुनी पदरीं घेई । विनती तुजला क्षणो-
क्षणीं ॥ कोणी नरांनीं विकूं नयेरे । राक्षसी
कृति करूं नयेरे ॥ अंतीं कीं ॥ २ ॥

[विषाचा पेला तोंडाजवळ नेऊन] देवा,

पद

मालकंस

क्षण स्व-स्वरूपा व मायावृत्ता । विसरूनी स्मरिते मी एक्या चित्ता ।। जगीं या कुणिही न वाली आह्मां ।। माता पिता, बंधु मानी तुह्मां ।। ।। क्षण ।। करीं घ्या त्वरीं या जगतारुनी । स्तविते मी तुमचे गुणगावुनी ।। क्षण ।। जालिम-विष आतां प्राशन करूनी ।। येतें मी सदनीं हा देह त्यजुनी ।। क्षण ।। १ ।।

[पेल्यांतील विष पिते]

बस झालें. ईश्वरा, माझी संसार यात्रा पूर्ण झाली. ह्या तुझ्या सहस्र अपराधी दासीला तुझ्या चरणाजवळ घेऊन जा. (घेरी घेऊन) अगाई, बाबा बा—बा ई—शा क्ष—मा कर.

(एकदम खालीं पडतें) तोंच (शंकरशास्त्री प्रवेश करून) सुंदरे, अग बाळे, ओ कांग देत नाहींस ? बाळे एकवार तरी मजबरोबर बोल.

सुंदरी:—(अंमळ शुद्धींत येऊन) को—ण बा—बा बा-बा तु—म च्या सारखे क्रू—र काम क-र-णा रे अ—धम तुह्मींच, आतां त्या द्रव्या—चें चां गलें चीज हो-ई—ल ना ! बा—बा म—ला क्षमा करा. प्रणाम

करितें. देवा मला आतां कायमचें दुःखांतून मोकळें कर. [प्राण सोडितें]

शंकरशास्त्रीः बाळे, अग बाळे, कांग बोलत नाहींस. देवा काय हा भयंकर प्रसंग ? (मोठमोठ्यानें हुंदके देऊन बेशुद्ध होतो)

एक मुलगाः—ईश्वरा, काय हा पापांचा भयंकर परिणाम !

पद.

चालः-(एक दीन जानारे भाई)

पाप कबू छूपेना भाई । ईससे नीतिमें रहेना ॥ पाप ॥ बुढा देखा लडकी बेचा । लिया रुपईया बहोत ॥ एक दिनमें ओ मरगया । ईस लडकीको ह्या छोड । पाप ॥ १ ॥ नीती छोडी बंदगी छोडी ! सब कूछ गई भूल ॥ यारके संग लंपट भई तों, रही हाथमें धूल ॥ पाप ॥ २ ॥ लडकीका धन हातमे आया । हुवा सट्टेमे लीन ॥ पहिले पहिले नफा दिखाके । फेर लिया सब छीन ॥ पाप ॥ ३ ॥ सुनो यारो क्यूं कर मारो लडकी गरीब गाय ॥ ईस दुनियामे बेचकर क्यूं । लेना उनकी हाय ॥ पाप ॥ ४ ॥ पून घटे और पाप बढे तुम । देखोरे सब कोई ॥ लक्ष्मी घरकी बेचकर भाई । कयसे रहेना रोई ॥ पाप ॥ ५ ॥

B/47